
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२१
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १७ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी उपक्रम/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
संजू-तिलकने लावली विक्रमांची रांग/८




# नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव देणार

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची करंजाडेतील सभेत ग्वाही

**पनवेल : नितीन देशमुख**

येथे साकारत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल. त्यामुळे याबाबत तुमच्या मनात असलेल्या शंका काढून टाका, अशी ग्वाही देतानाच आमच्या या दोन्ही विधानसभा मतदारसंघातील आमदारांचे काम चांगले आहे. जनता त्यांच्या सोबत आहे. मला विश्वास वाटतो पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येईल आणि या ठिकाणी दोन्ही आमदार प्रचंड मतांनी निवडून येतील, असा ठाम विश्वास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला. ते शुक्रवारी (दि. १५) करंजाडे येथे आयोजित प्रचार सभेत बोलत होते.



या सभेला प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, ज्येष्ठ नेते कर्णा शेलार, सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, समीर केणी, सुभाष म्हात्रे, माजी पं.स. सदस्य रेखा म्हात्रे, रूपेश धुमाळ, राकेश गायकवाड, प्रकाश पाटील, शिवसेनेचे युवा नेते रूपेश पाटील, संदेश पाटील, राष्ट्रवादीचे जयसिंग पाटील, आरपीआयचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने कार्यकर्ते हजर होते.

या वेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहळ यांनी सांगितले की, राज्य सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव पाठवला आहे. राज्यातील पुणे व नवी मुंबई या दोन विमानतळांचे नामकरण करण्यात येणार आहे. पुण्याला संत तुकाराम महाराजांचे, तर नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव दिले जाईल. **(पान २ वर..)**

### इकडचा-तिकडचा करणाऱ्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते -लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, आमदार महेश बालदी हे उरणच्या नगरपालिका शाळेत व आपल्या इथल्याच कॉलेजमध्ये शिकले आहेत. त्यामुळे आपला देश एक असताना जे लोक ते इकडचा-तिकडचा करतात त्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते. एखादी व्यक्ती १५ वर्षे इथे राहिली की ती स्थानिक होऊन जाते. आमदार महेश बालदी तर पिढ्यान्‌पिढ्या इथे राहिलेले आहेत. येथील लोकांची ते कामे करतात. त्यांचा वावर आगरी, कोळी, कऱ्हाडी, परप्रांतियांपासून अगदी मराठा समाजामध्येसुद्धा असतो. भविष्यात जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी व विकासाची कामे करण्यासाठी हक्काची माणसे लागतात. यासाठी त्यांना निवडून देणे गरजेचे आहे.



# विविध योजना राबवून जनतेची सेवा करणारे महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आणा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे मतदारांना आवाहन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

राज्यात महायुतीचे सरकार हे विविध योजना राबवून त्याचा लाभ नागरिकांना देत आहे. त्यामुळे जनतेची सेवा करणारे सरकार हे पुन्हा सत्तेत आणा आणि पनवेलमध्ये ज्या वेगाने विकासाची कामे झाली तोच विकासकामांचा झंझावात पुढील काळातही सुरू ठेवण्यासाठी येत्या २० तारखेला विकासाची निशाणी असलेल्या कमळ चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठ्यात प्रचारावेळी मतदारांना केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि मित्रपक्ष महायुतीचे पनवेल विधानसभा मतदारसंघातील उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचा जोरदार प्रचार सुरू आहे. त्यानुसार शुक्रवारी (दि. १५) कामोठे, नौपाडा आणि जुई गावात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढण्यात आली होती. या वेळी महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह जनतेचा लक्षणीय प्रतिसाद लाभला.

या प्रचारावेळी शिवसेनेचे पनवेल जिल्हाध्यक्ष रामदास शेवाळे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, पनवेल महापालिकचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, गोपीनाथ भगत, विकास घरत, दिलीप पाटील, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका अरुणा भगत, कुसुम म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, भाऊ भगत, प्रदीप भगत, राजेश गायकर, के.के. म्हात्रे, सुधाकर पाटील, हॅप्पी सिंग, महेंद्र भोपी, सचिन गायकवाड, हर्षवर्धन पाटील, आशा भगत, महिला मोर्चाच्या कामोठे मंडल अध्यक्षा वनिता पाटील, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### वाशी चेकनाका येथे ८० कोटींची चांदी जप्त

**मुंबई** : राज्यातील विधानसभा निवडणूक आचारसंहितेदरम्यान मानखुर्द पोलिसांनी वाशी चेकनाका परिसरात मोठी कारवाई करत एका ट्रकमधून तब्बल ८४७६ किलो चांदी जप्त केली आहे. या चांदीची किंमत जवळपास ८० कोटीपर्यंत आहे. या प्रकारानंतर पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतले आहे. अधिकृत कागदपत्रे आढळली नाहीत, तर संपूर्ण चांदी सरकारी तिजोरीत जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### नक्षलप्रभावित भामरागडमध्ये स्फोट; पोलीस यंत्रणा सतर्क

**भामरागड** : छत्तीसगड सीमेवरील नक्षलप्रभावित भामरागड येथे पर्लकोटा नदीजवळ नव्या पुलाचे बांधकाम सुरू आहे. तेथे रात्री स्फोट झाल्याची घटना शनिवारी (दि. १६) सकाळी उजेडात आली. नक्षलवाद्यांनी घातपाताच्या दृष्टीने हा स्फोट घडवून आणल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे. या परिसरात पोलिसांकडून सर्च ऑपरेशन सुरू आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. यंत्रणा सज्ज आहे, असे गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी म्हटले आहे.

# आता दहशतवाद्यांना स्वत:च्या घरातही असुरक्षित वाटते : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आता काळ बदलला असून दहशतवाद्यांना स्वत:च्या घरातही सुरक्षित वाटत नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी केले. त्यांनी पाकिस्तानचे नाव न घेता शेजारील देशासह जगाला कडक शब्दांत संदेश दिला.




पंतप्रधान म्हणाले की, शेजारील देशांनी पुरस्कृत केलेल्या दहशतवादी हल्ल्यांमुळे लोकांना स्वतःच्या घरात आणि शहरात असुरक्षित वाटत होते, मात्र आता दहशतवाद्यांनाच असुरक्षित वाटते. राजधानी दिल्लीत एका कार्यक्रमाला संबोधित करताना त्यांनी मुंबईतील २६/११च्या दहशतवादी हल्ल्याची आठवण काढत हे वक्तव्य केले. हे शतक भारताचे आहे. लोकांकडून, लोकांसाठी, लोकांची प्रगती हा नव्या आणि विकसित भारताचा मंत्र असल्याचे त्यांनी सांगितले.

१० वर्षांपूर्वी भारतात एवढ्या मोठ्या बदलांची अपेक्षा कोणीही केली नव्हती, परंतु हे शतक भारताचे शतक असेल. सरकार प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी वेगाने काम करत आहे. उत्पादन, बांधकाम, शिक्षण किंवा मनोरंजन अशा सर्व क्षेत्रात भारताचा जागतिक दर्जा तयार होणार असल्याचे सांगून भारत विकासाचा हा वेग कायम ठेवेल आणि लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास पंतप्रधान मोदींनी या वेळी व्यक्त केला.

### तुमची पूर्ण लेव्हल केल्याशिवाय राहणार नाही -मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई** : विक्रोळी मतदारसंघामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या उमेदवार सुवर्णा करंजे यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर करंजे यांच्या प्रचारासाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांनी माझ्या ताईचा अपमान करू नका. तुमची पूर्ण लेव्हल केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा दिला आहे.

मलापण तुम्ही हलक्यात घेतले. त्याचे परिणाम आता दिसत आहेत. शिवसेना आणि धनुष्यबाण तुम्ही काँग्रेसच्या दावणीला बांधला. आम्ही शिवसेना वाचवली. तुम्ही बाळासाहेबांचे विचार सोडले, म्हणून आम्ही तुम्हाला सोडण्याचा निर्णय घेतला, असेही मुख्यमंत्री शिंदेंनी म्हटले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व समाज बांधवांना न्याय देण्याचे काम केले

### भरघोस मतांनी विजयी करा -परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी कधीही धर्मभेद न करता सर्व समाज बांधवांना न्याय देण्याचे काम केले आहे. त्यामुळे आता सर्वांनी एकत्रित येऊन होऊ घातलेल्या निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १५) प्रचार कार्यालयाच्या उद्‌घाटनावेळी केले.



'आमदार प्रशांत ठाकूर अंगार है, बाकी सब भंगार है'च्या जयघोषात पनवेल कोळीवाड्यातील कोळेश्वर विद्यामंदिर शाळेसमोर त्यांचे प्रचार कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्‌घाटन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.

या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, उद्योजक इकबाल काझी, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, मुकीद काझी, पापा पटेल, भाजप शहर उपाध्यक्ष अमित ओझे, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रितम म्हात्रे, जवाद काझी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# कर्जतच्या भैरवनाथ यात्रेत डोलकाठीचा थरार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील किरवली, हालिवली, वांजळे आदी गावांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमा यात्रा स्वरूपात साजरी करण्यात येते. यंदा किरवली येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथाची यात्रा उत्साहात झाली. यानिमित्ताने किरवली, देऊळवाडी येथे तरुणांनी डोलकाठी नाचवली. हा थरार पाहण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

किरवली देऊळवाडी येथील श्री भैरवनाथ मंदिराच्या परिसरात श्री भैरवनाथाची यात्रा पहाटे साडेचार वाजता काकड आरतीने सुरू झाली. त्यानंतर परिसरातील श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन झाले. परंपरेनुसार डोलकाठीच्या टोकाला ढाक येथील भैरी मंदिरातून ट्रस्टचे सचिव दिलीप बडेकर यांच्या नेतृत्वाखाली



आणलेला गरूडध्वज बांधण्यात आला. डोलकाठीची पूजा ट्रस्टचे किसन बडेकर हस्ते करण्यात आली. त्यानंतर डोलकाठीचा मोर पिसाऱ्याने शिवमंदिरातील शिवपिंडीला आरतीच्या वेळी वारा घालून ही ३० फुट उंचीची वजनी डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर व हातावर ठेवून संकेत बडेकर, दीपक आंग्रे, सौरभ बडेकर, वैभव थोरवे आदींनी नाचवित नेली. ही वजनी डोलकाठी नाचवण्यासाठी ताकदीबरोबरच अनुभवाची आवश्यकता असते.

डोलकाठी नाचवत नाचवत देऊळवाडी, पुलाचीवाडी, बोरवाडी, किरवली येथे नेण्यात आली. त्या पाठोपाठ श्री भैरवनाथाची पालखी होती. प्रत्येक घरी पालखीत असलेल्या अश्वारूढ श्री भैरवनाथाच्या मूर्तीची पूजा करण्यात आली. दिवेलागणीच्या सुमारास सुवासिनींनी उकडलेल्या पिठाचे दिवे सुपातून उडविले.

श्री भैरवनाथाचे दर्शन घेण्यासाठी व नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी होती. पुत्रप्राप्तीसाठी केलेला नवस बालकांची गुळाची तुला करून फेडण्यात येत होता. नवजात बालकांनासुद्धा श्री भैरवनाथाच्या पायाशी ठेवून दर्शन घेण्यासाठी गर्दी होती. एकंदरीत त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

### बस उलटून २६ जण जखमी

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पेण तालुक्यातील आमटेमनजीक खासगी आराम बसच्या चालकास डुलकी लागल्याने बस उलटली. या अपघातात चालकासह २६ जण जखमी झाले आहेत.

राजापूर येथून मुंबईकडे जाणारी बस (एमएच ४७-बीएल ६२९९) पेण तालुक्यातील आमटेमनजीक आली असता चालक विनोद हळदणकर याला डुलकी लागली. त्यामुळे ही बस रस्त्याच्या खाली जाऊन उलटली. या अपघातात २६ जण जखमी झाले. जखमींमध्ये चालकाचाही समावेश आहे. यापैकी २२ जण किरकोळ जखमी होते, तर उर्वरित चार जणांनाही त्यांचे नातेवाईक मुंबईला घेऊन गेले आहेत.

# आमदार रविशेठ पाटील यांच्यासाठी नागोठणे मोहल्ल्यात प्रचार फेरी





**नागोठणे : बातमीदार**

महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारार्थ नागोठणे मोहल्ल्यात काढण्यात आलेल्या प्रचार फेरीला मुस्लिम बांधव व भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जनतेची सेवा करणारा लोकप्रतिनिधी असला पाहिजे म्हणून रविशेठ पाटील साहेबांना भरघोस मतांनी निवडून द्या असे आवाहन करून रविशेठ पाटील यांच्या चाळीस वर्षांच्या तपश्चर्यापुढे कुणीही चालू शकणार नाही, असा विश्वास पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी नागोठणे मोहल्ल्यात व्यक्त केला. प्रचार फेरी पूर्वी मोहल्ल्यातील भाजप नेते सिराज पानसरे यांच्या निवासस्थानी महायुतीच्या कार्यकर्त्यांची घेण्यात आलेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना प्रितमताई पाटील बोलत होत्या.यावेळी माजी जिप सदस्या कौशल्याताई पाटील (काकू), राष्ट्रवादीचे नेते नरेंद्रशेठ जैन, दिलीपभाई टके, भाजप नेते मारुती देवरे, राष्ट्रवादी नेते हरीशशेठ काळे, विलास चौलकर, लियाकतशेठ कडवेकर, भाजप जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, माजी जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, राष्ट्रवादी विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, भाजप शहर अध्यक्ष सचिन मोदी, प्रकाशशेठ जैन, सुधाकर जवके, राष्ट्रवादी युवा नेते प्रथमेश काळे, बिपीन सोष्टे, मनोज टके, सिराज पानसरे, राउफ कडवेकर, राजेंद्र लवटे, असगर सय्यद,सद्दाम दफेदार, रमीज दफेदार, आशा शिर्के, सुजाता जवके, प्रतिभा तेरडे, पूनम काळे, जयश्री भांड, अश्विनी खरे, विजया पाटील, रुपाली पाटील, प्रतिभा पाटील, सुषमा पाटील, मंदार चितळे, राउफ कडवेकर, कुणाल तेरडे, सखाराम ताडकर, काजीम पानसरे, विवेक रावकर, मुग्धा गडकरी, संज्योती लाड, राजन दुबे, मुजफ्फर कडवेकर, तात्या पोत्रिक, वासिम बेडोरे, सुनिता तटकरे, उमेर सांगडे, फातिमा सय्यद सुमाया पानसरे, अमरीन पानसरे, महम्मद चोगले, तबसूम कडवेकर, रुबीना सय्यद आदिंसह महायुतीचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### ‘रविशेठ पाटील आमचे कुटुंबीय’

**मी महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांचा प्रचार करत असून नागोठणे मोहल्ल्यातून रविशेठ पाटील यांना उच्च मताधिक्य मिळवून देणार आहे कारण रविशेठ पाटील हे आमचे कुटुंबीय आहेत, असे वक्तव्य तत्कालीन काँग्रेस नेते नागोठणे माजी सरपंच फर्मानशेठ दफेदार यांचे सुपुत्र काँग्रेस युवा नेते सद्दाम दफेदार यांनी दै. रामप्रहरशी बोलताना केले.**

# मध्य रेल्वे निवडणुकीत विशेष उपनगरीय गाड्या चालवणार




**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निवडणूक कर्मचारी आणि जनतेच्या हालचाली सुलभ करण्यासाठी १९ व २० नोव्हेंबर (मंगळवार-बुधवार रात्री) आणि २० व २१ नोव्हेंबर (बुधवार-गुरुवार रात्री) विशेष उपनगरीय गाड्या चालवणार आहे.

या गाड्या मेन लाइन (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कल्याण) आणि हार्बर लाईन (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-पनवेल)वर सुटण्याच्या आणि आगमनाच्या वेळेसह चालतील.

या विशेष सेवांमुळे संपर्क वाढवणे आणि निवडणूक सहभागींची सुरळीत हालचाल सुनिश्चित करणे अपेक्षित आहे. या रात्री प्रवाशांना त्यांच्या प्रवासाच्या गरजांसाठी या अतिरिक्त सेवांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. आशा आहे की, या उपक्रमामुळे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता येईल.

**विशेष उपनगरीय गाड्यांचे वेळापत्रक**

मंगळवार-बुधवार रात्री (१९-२० नोव्हेंबर) मुख्य लाईन (डाऊन) : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कल्याण विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ३ वाजता सुटेल व कल्याण येथे ४.३० वाजता पोहचेल.

मेन लाईन (अप) : कल्याण-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष कल्याण येथून ३ वाजता सुटेल व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे ४.३० वा. पोहचेल.

हार्बर लाइन (डाऊन) : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-पनवेल विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ३ वाजता सुटेल व पनवेल येथे ४.२० वाजता पोहचेल.

हार्बर लाइन (अप) : पनवेल-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष २ : पनवेल येथून ३ वाजता सुटेल व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे ४.२० वाजता पोहचेल.

बुधवार-गुरुवार रात्री (२०-२१ नोव्हेंबर) मुख्य लाईन (डाऊन) : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- कल्याण विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १.१० वाजता सुटेल व कल्याण येथे २.४० वाजता पोहचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कल्याण विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ०२.३० वाजता सुटेल व कल्याण येथे ४ वाजता पोहचेल.

मेन लाईन (अप) : कल्याण-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्पेशल कल्याण १ वाजता सुटेल व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे २.३० वा. पोहचेल.

कल्याण-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष कल्याण येथून २ वाजता सुटेल व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे ३.३० वाजता पोहचेल.

हार्बर लाइन (डाऊन) : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- पनवेल विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १.४० वाजता सुटेल, पनवेल येथे ३ वाजता पोहचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-पनवेल विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २.५० वाजता सुटेल व पनवेल येथे ४.१० वाजता पोहचेल.

हार्बर लाइन (अप) : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-पनवेल विशेष पनवेल येथून १ वाजता सुटेल व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे २.२० वाजता पोहचेल.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-पनवेल स्पेशल पनवेल येथून २.३० वाजता सुटेल व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे ३.५० वाजता पोहचेल.

सूचीबद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार सर्व विशेष गाड्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कल्याण आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-पनवेलदरम्यानच्या सर्व स्थानकांवर थांबतील.

# खालापूरमध्ये प्रवासात चोरीच्या घटना

**खोपोली : प्रतिनिधी**

दोन वेगवेगळ्या घटनेत खालापूर हद्दीत चोरट्यांनी महिला प्रवाशांना हाथ की सफाई दाखवली आहे.

पहिली घटना मुंबई पुणे एक्सप्रेस वर फुडमॉल येथे घडली आहे. आरोही राकेश मालवी (वय २१, रा. हवेली पुणे) ही पुणे येथून मुंबईला येणाऱ्या शिवनेरी बसने प्रवास करत असताना बस पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवरील फुडमॉल येथे थांबली होती. आरोही बसमधून खाली उतरून चहा पिण्यासाठी गेली असताना चोरट्याने डाव साधत आरोहीची लॅपटॉपची बॅग व पर्समध्ये ठेवले ६०० रुपये व कागदपत्रे चोरून नेली. याबाबत खोपोली ठाणे पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार सुजित माळी हे करीत आहेत.

चोरीची दुसरी घटना खोपोली शिळफाटा येथील बसस्थानक येथे घडली. बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दर्शना दिलीप गोळे (वय ५७, रा. चिंचवली, खोपोली) व त्यांची जाउबाई अशा दोघी शिळफाटा बस स्थानकावरून खोपोली ते पेण अशी जाणाऱ्या एसटी बसमध्ये बसुन जात होत्या. प्रवासात चोरट्यांने दर्शना यांच्या डावे हातातील एकूण ६० हजार रुपये किमतीची सोन्याची बांगडी हातोहात लंपास केली.

चोरीचा प्रकार लक्षात आल्यानंतर दर्शनाने थेट पोलीस ठाणे गाठत तक्रार नोंदवली आहे. याबाबत खोपोली ठाणे पोलीस येथे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस नाईक प्रदीप कुंभार अधिक तपास करीत आहेत.

# सव्वा लाखाची रोकड जप्त

**पनवेल :** पनवेल विधानसभा मतदारसंघ, निवडणूक विभाग, आचारसंहिता पथकांतर्गत शनिवारी (दि.१६) सकाळी ०९:५० वाजण्याचे दरम्यान कल्याण शिळफटा ते कळंबोलीच्या दिशेने जाणाऱ्या धानसर टोल नाका येथे रोडवरून जाणाऱ्या पांढऱ्या रंगाची क्रेटा कंपनीची चार चाकी गाडीस थांबवून तपासणी केली असता, त्या गाडीत असलेल्या ब्राउन कलरच्या लेदर बॅगमध्ये एक लाख सव्वीस हजार पाचशे रुपयांची रोख रक्कम आढळून आली. स्थिर सर्वेक्षण पथक क्र. ०१ मार्फत सदरील रोख रक्कम जप्त करण्यात आली. कारवाई १८८ पनवेले विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



# मनःशांती विषयावर कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

मानसिक समाधानासाठी संतुलित जीवन पद्धती, सुदृढ आरोग्य आवश्यक आहे, कारण याचा थेट परिणाम कार्यक्षमतेवर होतो. महानिर्मिती गतिमान प्रशासन मानव संसाधनाच्या माध्यमातून मनुष्यबळाच्या मानसिक समाधानाचा विचार करून दिलखुलास आणि उपयुक्त असा मी, माझे पद आणि मनःशांती ह्या विषयावर डॉ. संजय उपाध्ये, पुणे यांच्या कार्यक्रमाचे आयोजन प्रकाशगड मुख्यालय येथे केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी संचालक (प्रकल्प व इंधन) अभय हरणे, विशेष अतिथी डॉ. नितीन वाघ कार्यकारी संचालक (मानव संसाधन) प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

डॉ. संजय उपाध्ये यांनी मन:शांती ढासळण्याची विविध कारणे सांगितली, त्यात प्रमुख कारण ‘पद’ असल्याचे सांगितले. ‘पद’ हे मानवी आयुष्याचा महत्वाचा भाग असून मनः शांती ढळण्याचे प्रमुख चार ठिकाणं आहेत – घर, समाज, कार्यालय आणि निसर्ग. मन:शांती दैनंदिन कार्यावर अवलंबून असते. स्थान बदलले की पद बदलले पाहिजे. एकच भूमिका सगळीकडे घेऊन चालत नाही. भूमिका बदलता आली पाहिजे. वेष, आवेश, कर्म, बुद्धी आणि परिणाम हे सूत्र लक्षात ठेवून पदाचे भान ठेवा असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमावेळी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक विवेक रोकडे, मुख्य अभियंते राहुल नाळे, प्रसन्न कोटेचा, विजय बारंगे, विजया बोरकर, अनिल काठोये, मुख्य महाव्यवस्थापक आनंद कोंत, विश्वनाथ कुळकर्णी, हर्षल भास्करे, कंपनी सचिव राहुल दुबे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजुरकर, अग्नी सल्लागार व मुख्य अग्निशामक अधिकारी शशिकांत पापडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते तसेच महानिर्मितीचे विभाग प्रमुख, महावितरण, महापारेषणचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचलन व आभार सोनाली चुंगडे यांनी मानले.

# गृहनिर्माण वसाहतींच्या अध्यक्ष, सचिवांची बैठक

## मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये शनिवारी (दि.१६) विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमधील गृहनिर्माण वसाहतींच्या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप अभियान अंतर्गत गृहनिर्माण वसाहतींच्या अध्यक्ष तसेच सचिव यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या वेळी लोकशाहीचा सोहळा यशस्वी होण्यासाठी प्रत्येक मतदराने आपला अधिकार वापरावा, जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे. लोकशाही जास्तीत जास्त सशक्त होण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन पनवेल तालुक्याचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांनी केले.

बैठकीवेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, स्वीप कार्यक्रम प्रमुख शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संजय भालेराव, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, अभियंता गजानन देशमुख, महापालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते म्हणाले, कर्तव्य भावनेने उपस्थित सोसायटीच्या अध्यक्ष व सचिवांनी आपल्या सोसायटीमध्ये, आसपासच्या सोसायटीमध्ये मतदान करण्यासाठी नागरिकांना आवाहन करा, मतदान वाढवण्यासाठी स्पर्धा घ्या, समाज माध्यमचा वापर करा. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सोसायटीमधील नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करण्याविषयी त्यांनी सांगितले.

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक होत आहे. या निवडणुकीमध्ये गृहनिर्माण वसाहतींच्या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी १८८ पनवेल विधानसभा मतदार संघातील स्विप अभियान अंतर्गत मतदान जनजागृती करण्यासाठी पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे व निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त माध्यमातून या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस महापालिका कार्यक्षेत्रातील ५० हून अधिक गृहनिर्माण वसाहतींचे प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी उपस्थितांना मतदान शपथ देण्यात आली.

# ट्रेलरला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू; कळंबोलीतील घटना

**पनवेल :** पनवेल-मुंब्रा मार्गावर कळंबोली येथील स्टीलमार्केट येथे रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रेलरला धडक दिल्याने एका दुचाकीचालकाचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रेलरचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दहिसर मोरी येथे गालिब आजमी यांचे टायरचे दुकान आहे. पनवेल येथे काही कामानिमित्त आले होते. रात्री साडेआठच्या सुमारास घरी परतत असताना कळंबोली स्टील मार्केटमधील फुडलँड कंपनीजवळील रोडवर उभ्या असलेल्या ट्रेलरचा अंदाज आला नसल्याने त्यांच्या स्कूटीने ट्रेलरला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या गालिब यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. रस्त्यावरच ट्रेलर उभा केल्यामुळे याप्रकरणी ट्रेलरचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

पान १ वरुन

# नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव देणार

खारघर येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.बा. पाटील यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. त्यामुळे तुमच्या मनातील शंका आता काढून टाका. एक लाख टक्के त्यांचेच नाव दिले जाईल. दिलेले वचन मी पूर्ण करणार आहे, असेही ते म्हणाले.

या विमानतळासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्या भूमिपुत्रांना न्याय देण्यासाठी त्यांच्या नोकरीचा विषय असेल किंवा मोबदल्याचा विषय असेल तो मला हक्काने सांगा. मी पूर्ण करून देईन, मागे हटणार नाही. या ठिकाणी दोन रनवे आहेत, पण तिसऱ्या आणि चौथ्या रनवेच्या शक्यतेच्या रिपोर्टवर आता काम सुरू आहे. त्यामुळे विस्थापित होणाऱ्या पाच गावांचे पुनर्वसन आणि त्यांना योग्य मोबदला दिला जाईल, असे आश्वासन ना. मुरलीधर मोहोळ यांनी दिले.



या निवडणुकीचा नुकताच एक सर्वे आला आहे. त्यानुसार महायुतीच्या १८५-१९०च्या आसपास जागा निवडून येऊन पुन्हा महायुतीचे सरकार येईल. त्यामध्ये उरणमध्ये आमदार महेश बालदी निवडून येण्याचे स्पष्ट दिसत आहे. विकसित भारताचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाहिले. दहा वर्षे जनतेने मला सेवा करण्याची संधी दिली. तिच्याकडे मी विकसित भारताचा पाया म्हणून पाहत असल्याचे ते सांगतात. जागतिक स्तरावर आपण आज पाचव्या अर्थव्यवस्थेवर आलो. एका बाजूला जागतिक स्तरावर देशाचे नाव मोठे करणे आणि दुसऱ्या बाजूला देशातील जनतेच्या हिताचा ही विचार करणे ही भूमिका घेऊन मोदीजी काम करीत आहेत. राज्यातही आपल्या महायुतीचे सरकारने अडीच वर्षात ५२ टक्के विदेशी गुंतवणूक आणली हे आपले यश आहे. अनेक विकासाची कामे अडीच वर्षात करण्यात आली. सामन्यांच्या हिताचा विचार करून लाडकी बहीण योजना, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी आणि युवकांचे प्रश्न सोडवले. जनकल्याणाच्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. साडेपाच हजार कोटींची कामे या विधानसभा मतदारसंघात केली आहेत. पनवेल-उरण मार्गावरील नवीन पूल करण्याची मागणी आमदार महेश बालदी पूर्ण करतील, असेही ना. मोहोळ म्हणाले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी आमदार महेश बालदी यांच्या कामाचे कौतुक केले. २०१४मध्ये आमदार असलेल्यांनी किती निधी आणला व त्यांच्या कामाची पद्धत याची तुलना त्यांनी केली. महेश बालदी यांनी या भागाचा कायापालट करताना राज्य सरकारच्या अनेक योजना राबवल्या. येथील पाण्याचा, रस्त्याचा प्रश्न राज्य सरकारच्या माध्यमातून सोडवला. सकारात्मक काम केले आहे. महेश बालदी सगळ्या गोष्टी करतात याची खंत विरोधकांना आहे. या भागात चांगल्या योजना मार्गी लागण्यासाठी त्यांना पुन्हा निवडून देण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बोलताना, उलवे येथील गर्दी पाहिल्यावर मी भविष्य वर्तवले होते की, आमदार महेश बालदी पुन्हा आमदार होणार. आज येथे आल्यावर गर्दी पाहून वाटते मागच्यापेक्षा या वेळी जास्त आघाडी घेऊन ते निवडून येतील असे चित्र दिसायला लागले असल्याचे सांगितले. या वेळी त्यांनी विस्थापित होणाऱ्या पाच गावांनाही तोच न्याय देण्याची मागणी केली.

आमदार महेश बालदी यांनी, पुढील पाच वर्षात उरण मतदारसंघातील आदिवासीवाडीतील एकही घर कुडाचे राहणार नाही. सर्वांना पक्की घरे मिळतील, असे सांगून करंजाडे नोड आधुनिक बनविल्याशिवाय राहणार नाही. आता पाच हजार कोटींची कामे केली. पुढील पाच वर्षात १५ हजार कोटींची कामे करणार असल्याचे सांगितले. या वेळी सरपंच मंगेश शेलार, रूपेश पाटील, रेखा म्हात्रे, अतुल पाटील यांचीही भाषणे झाली. त्यांनी आमदार महेश बालदी यांना पुन्हा निवडून देण्याचे आवाहन केले.

# नवीन पनवेलमधून आमदार प्रशांत ठाकूर यांना मताधिक्य देणार -संदीप पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचा विकास करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांना नवीन पनवेलमधून मताधिक्य देऊन बहुमताने निवडून आणणार, असा ठाम विश्वास भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष व माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांनी व्यक्त केला.



नवीन पनवेल येथे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.सेक्टर १८ मधील सिडको विनायक मंदिरातील श्री गणेशाचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरूवात केली. या वेळी माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांनी बोलताना सांगितले की, पनवेलच्या विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर विजयी होणे गरजेचे आहे तसेच महायुती सरकारने जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवून त्यांचा लाभ सर्वसामान्य माणसाला मिळवून दिला आहे. लाडकी बहीण योजना राबवून महिला सक्षमीकरणाचे काम केले आहे आत्ता या योजनेचे पैसे वाढविण्यात येणार आहेत. त्यामुळे गतीमान पद्धतीने काम करणारे महायुतीचे सरकार राज्यात पुन्हा सत्तेत आणा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पनवेल विधानसभा मतदार संघाचा विकास करणारे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रचारात जोरदार आघाडीत घेतली आहे. महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे संपुर्ण मतदार संघ पिंजून काढत आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचंड मतांनी विजयी करण्यासाठी जोरदार प्रचार करत आहेत. या वेळी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, जगदीश घरत, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, विभागीय अध्यक्ष विजय म्हात्रे, जितेंद्र वाघमारे, ॲड. चंद्रकांत मढवी, गंगाधर भगत, महेश तांडेल, मयूर कदम, गिरीश खरिवले, पप्पू साळवी, अमोल भगत, पप्पू वाघमारे आदी उपस्थित होते.

# संकट काळात ठाकूर कुटुंबियांनी केलेली मदत जनता विसरणार नाही -जरीना शेख

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोनाच्या संकट काळात लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांतदादा ठाकूर, परेशदादा ठाकूर यांनी केलेली मदत पनवेलची जनता कधीच विसरणार नाही, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या जरीना शेख यांनी केले. गोरगरिबांचा विचार करणारे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले.



जरीना शेख यांनी पनवेल विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बोलताना सांगितले की, कोरोना आणि त्यामुळे आलेल्या लॉकडाऊन परिस्थितीत नागरिकांवर उपासमारीची वेळ आली होती, मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गरीबाचा विचार करून त्यांना सर्वोत्तपरी मदत केली. कोरोना महामारीने जीव वाचवताना सर्वसामान्यांना पोटाच्या खळगीचा प्रश्न निर्माण झाला. अशा या भूतो न भविष्यतो संकटकालीन परिस्थितीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लाखो जणांना मदतीचा हात दिला.

कोरोनाच्या काळात दिड लाखाहून अधिक अन्नधान्याचे किट, दिड लाखाहून अधिक व्यक्तींना अन्नछत्र, एक लाखाहून अधिक मास्क, सॅनिटायझर, औषधे, रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबिरांचे आयोजन, आर्थिक मदत, अशी हरएक मदत गरजूंना करून कोरोना काळात नागरिकांना मोठा दिलासा देण्याचे काम केले. विशेष म्हणजेच ही मदत करत असताना कोरोना म्हणजे मृत्यू अशी परिस्थिती असतानाही आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी रुग्णालयात जाऊन कोरोनाग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांना मोठा धीर दिला होता हे सर्व जनतेने पहिले आहे.

कोरोना काळाच्या आठवणी जाग्या झाल्यावर आजही अंगावर काटा येतो. ती भयानक परिस्थिती होती. एका बाजूला या आजाराची तर दुसऱ्या बाजूला पोटाची खळगी भरण्याची चिंता होती. मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर, प्रशांतदादा आणि परेशदादांना सर्वसामान्य माणसाची काळजी होती. त्यामुळे त्यांनी तळागाळात अगदी झोपड्पट्टीपर्यंत मदत पोहचवली. कोरोनाच्या पूर्वी जेव्हा महापुराचे संकट आले होते तेव्हाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अग्रेसर राहत सर्वतोपरी मदत करत या संकटातूनही लोकांना बाहेर काढले होते. त्यामुळे कोणतीही आपत्ती येवो लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, परेशदादा ठाकूर लोकांच्या मदतीला सामाजिक बांधिलकीने धावून जात असतात, त्यामुळे सुजाण नागरिक म्हणून सर्वांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे, असेही जरीना शेख यांनी नमूद केले.

# आमदार महेश बालदी यांचा विविध वाड्यांमध्ये प्रचार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा प्रचार सभा प्रमुख प्रवीण काळबागे, माजी जि.प.सदस्य ज्ञानेश्वर घरत व सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी उरण मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या विजयासाठी विविध वाड्यांमध्ये जाऊन प्रचार केला. या वेळी कार्यकर्ते, स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

प्रचारासाठी मोदीमाल वाडी, तुळशीमाळ वाडी, सवणे आदिवासी वाडी, गायचरण वाडी, खुटल वाडी, जांभीवली वाडी, पेरूची वाडी, कालीवली वाडी, कल्हे विठ्ठल वाडी, लहुची वाडी, ब्राम्हण डूगी वाडी, आखाडा वाडी, खैराट वाडी, बानुबाई वाडी, आपटा दाभोळवाडी, रामवाडी, तलापाळी वाडी, गंगेचीवाडी या ठिकाणी संवाद फेरी आयोजित करण्यात आली होती.

# पनवेलमध्ये होणार ११ दिवसांचा संविधान महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्यदिनाला यावर्षी ७७ वर्षे पूर्ण झाली आणि भारतीय संविधान स्वीकृती दिनाला २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्षे पूर्ण होतील. सालाबादप्रमाणे याही वर्षी संविधान महोत्सव समितीच्या माध्यमातून शनिवार २३ नोव्हेंबर ते मंगळवार ३ डिसेंबर २०२४ असा ११ दिवसांचा संविधान महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

यात संविधान समजून सांगणाऱ्या बौद्धिक गोष्टी, कलाप्रदर्शन आणि विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, त्याचसोबत रोषणाई, सांस्कृतिक प्रबोधन, मान्यवरांची व्याख्याने असे विविध उपक्रम आयोजित करण्यात येतील तसेच संविधान कट्टा, संविधान गार्डन, संविधान चौक आणि संविधान घराची प्रतिकृती संविधान महोत्सवामध्ये लावण्यात येणार आहे. या सगळ्याच्या मुळाशी भारतीय संविधानाची मुल्ये, अधिकार, आपली कर्तव्ये असतील. भारताचे संविधान आणि त्यातील मूल्ये आपल्या सर्वांसाठी उपलब्ध आहेत. आपल्याला या मूल्यांसोबत जगायचे आहे. सर्व भारतीयांना आठवण करून देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

संविधान महोत्सवाचे ठिकाण प्लॉट १-, सेक्टर ५- गुरुद्वारा जवळ, नवीन पनवेल आहे. सर्व नागरिकांनी आप-आपल्या संस्था/संघटन आणि राजकीय पक्ष बाजूला ठेऊन भारतीय नागरिक म्हणून संविधान महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन संविधान महोत्सव समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

## निवडक

### डॉ. शुभदा नील यांचा सत्कार



**पनवेल :** डिवाईन संस्कार रिसर्च फाउंडेशन ट्रस्टतर्फे गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची मोफत तपासणी शिबिर नील हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आले. या वेळी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंध करण्यासाठी करत असलेल्या मोलाच्या कार्यासाठी प्रसिध्द स्त्रीरोग व कॅन्सर तज्ज्ञ बीके डॉ. शुभदा नील यांचा इनरव्हील क्लब नवीन पनवेलच्या अध्यक्षा ॲड. संपदा बापट, सचिव अंजली राजपूत व प्रोजेक्ट पर्सन नैंना बांठीया यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. एचपीव्ही डीएनए टेस्ट व एचपीव्ही वॅक्सिन द्वारे गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंध करण्यासाठी डॉ. शुभदा नील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

### बाल दिनानिमित्त छोट्यांची धम्माल



**पनवेल :** चाचा नेहरू यांच्या जन्मदिनानिमित्त स्वरसंस्कार संगीत विद्यालयात बालदिन साजरा करण्यात आला. या वेळी गाणे, डान्स याबरोबरच जादूगर भिकू शिंदे यांचा जादूचा प्रयोगचा मुलांनी आस्वाद घेतला आणि धमाल केली. स्वरसंस्कार विद्यालयात सर्व वयोगटातील विद्यार्थी असून शास्त्रीय संगीतासोबत सुगम संगीत, पेटी, टॅबला, गिटार, पाश्चात्य नृत्य, भरतनाट्यम, झुंबा तसेच अबॅकसचे ही क्लासेस चालतात. १०० हून अधिक विद्यार्थी या विद्यालयात शिकत आहेत व निरनिराळ्या स्पर्धांमध्ये यश मिळवत आहेत.

### मालाने भरलेला ट्रक उलटला

**पनवेल :** मालाने भरलेला ट्रक मध्यरात्रीच्या सुमारास तालुक्यातील तारा गावाच्या हद्दीत उलटल्याची घटना घडली असून यामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. पनवेल बाजूकडून महाड बाजूकडून मालाने भरलेला ट्रक (एमएच १२ एडी ३९४३) चाललेला असताना तारा गावाच्या हद्दीत ट्रक चालकाचा गाडीवरून ताबा सुटून ट्रक रस्त्यावर आडवा झाला. यामुळे काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती. हायड्राच्या सहाय्याने ट्रक बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# केळवणे येथे आमदार महेश बालदींच्या प्रचाराचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष केळवणे येथे उरण मतदार संघाचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या प्रचाराचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार घालून आई गावदेवी चरणी नारळ फोडून करण्यात आला. या वेळी आमदार महेश बालदी यांच्या पत्नी नीता बालदी यांची उपस्थिती लाभली.





या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस तथा माजी जि.प.सदस्य ज्ञानेश्वर घरत, उरण तालुका भाजपच्या महिला अध्यक्षा राणी सुरज म्हात्रे, माजी केळवणे पं.स. युवा मोर्चा अध्यक्ष सुशील ठाकूर, केळवणे शाखा प्रमुख रामचंद्र मोकळ, ग्रामपंचायत सदस्य ओंकार पाटील, मुक्ता माळी, आरती कोळी, निलम कोळी, माजी सरपंच जगन्नाथ म्हात्रे, माजी उपसरपंच भानुदास गावंड, राजेंद्र ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते जनार्दन थली, रवींद्र माळी, महादेव म्हात्रे, रमेश ठाकूर, प्रमोद ठाकूर, गजानन पाटील, सतीश घरत अनंता गावंड, निलेश पाटील, धर्मेंद्र भोईर, विलास ठाकूर, नारायण म्हात्रे, हरी ठाकूर, राजेश घरत, संजय मारुती पाटील, जितेंद्र घरत, भारत ठाकूर, दत्तात्रेय शिवकर, सागर ठाकूर, नंदकुमार गावंड, देविदास कोळी, रोहिदास घरत, उत्तम पाटील, भगवान म्हात्रे, हरिश्चंद्र पाटील, जयवंत गावंड, सुरेश महाराज शिवकर, हिरामण पाटील, निलेश म्हात्रे, नारायण पाटील, विजय पाटील, दर्शन मोकल, सचिन कोळी, किरण कोळी, विनायक कोळी, अरुण कोळी, देविदास कोळी, युवा कार्यकर्ते सचिन ठाकूर, जितू गावंड, समीर ठाकूर, तेजस माळी, संतोष शिवकर, आरकेश म्हात्रे, कुमार मोकल, प्रमोद पाटील, सत्यम ठाकूर पिंट्या ठाकूर, कृष्णा म्हात्रे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## घरोघरी जाहीरनामा वाटप



**कळंबोली : केएल ४ सेक्टर या ठिकाणी घरोघरी महायुतीचा विकासाचा जाहीरनामा जनतेला वाटप करण्यात आला. या वेळी भाजप भटक्यांचा आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, माजी नगरसेवक बबन मुकादम, श्रीकांत ठाकूर, प्रभाग अध्यक्ष प्रकाश शेलार, मनीष तिवारी, आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष लक्ष्मण जायभाय, आजिनाथ जायभाय आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# आमदार प्रशांत ठाकूर यांना राजस्थानी समाजाचा जाहीर पाठिंबा

**खारघर : रामप्रहर वृत्त**


खारघर राजस्थानी समाजच्या वतीने दिपावली स्नेह मिलन आणि विशाल भजन संध्या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांना राजस्थानी समाज बांधवांनी आपले समर्थन देत जाहीर पाठिंबा दिला. जे आपल्या हिंदुत्वाचे संरक्षण करणारे आहेत, जे आपल्या सुखा दुःखात सोबत राहतात आणि सर्व समाजाला न्याय मिळवू देण्यासाठी कटीबद्ध असतात अश्या आमदार प्रशांत ठाकूर यांनाच आपल्याला विधानसभा निवडणुकीत विजयी करायच आहे हा निर्धार या वेळी समाज बांधवांनी व्यक्त केला.

पनवेल विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना विविध संस्था, समाज आणि संघटनांचा दिवसेंदिवस पाठिंबा वाढत आहे. त्यानुसार खारघरमध्ये झालेल्या राजस्थानी समाजाच्या कार्यक्रमात सिरवी समाज, राजपुरोहीत समाज, सेनी समाज, बिष्णोई समाज, जैन समाज, पटेल समाज, देवासी समाज आणि जाट समाजाने आपले समर्थन देत पाठिंबा दिला.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, विजय पाटील, राष्ट्रवादीचे शिवदास कांबळे, रघुनाथ सिंग, राजेश अग्रवाल, सिरवी समाजाचे हरिष चौधरी, राजपुरोहीत समाजाचे रघुनाथ सिंह, सेनी समाजाचे बनवारी लालजी, बिष्णोई समाजाचे मनोहरजी, महाविरजी, पटेल समाजाचे जीवा रामजी, देवासी समाजाचे महेंद्रजी, जाट समाजाचे किसनजी, काळुरामजी यांच्यासह समाजा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.










# इश्क इश्क इश्क ५० वर्ष

## प्रेमाच्या गोष्टीत देव आनंद चक्क अनुत्तीर्ण

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

देव आनंदचं पाहणं/ऐकणं/असणं/हसणं/बोलणं/सांगणं/गाणं यात प्रेमाचा मुरंबा/लोणचं/पिझ्झा असं काही भरलयं की हिंदी चित्रपटाच्या पडद्यावर प्रेम पाहताना/ऐकताना पहावे ते फक्त आणि फक्त देव आनंदला...

पलभर के लिए कोई हमे प्यार करले अशी विनवणी असो की दिल का भंवर करे पुकार प्यार का राग सुनो रे असो, त्याने रूपेरी पडद्यावर साकारलेले कोणतेही प्रेम गीत असो, ते आठवताच आपण ते गुणगुणायला लागतो ते गाणे देव आनंदच्या छोट्या छोट्या प्रेमाच्या लकबीसह डोळ्यासमोर येतेच. रसिकांच्या किमान तीन पिढ्या देव आनंदच्या प्रेम शैलीवर लट्टू होत्या. त्याच्या चालण्यात प्रेम (यह दिल ना होता बेचारा), त्याच्या प्रेयसीच्या छेडछाडीत प्रेम (छोड दो आंचल जमाना क्या कहेगा...इन अदाओ पे).

प्रेम ही त्याची अभिनेता म्हणून पहिली आणि कायमची ओळख. त्याशिवाय त्याने भावनिक क्षण (गाईड), समजदार पती (तेरे मेरे सपने), पिस्तूलधारी नायक (जॉनी मेरा नाम), ढिश्यूम ढिश्यूम हीरो (अमीर गरीब) असे बरेच काही केले, पण त्याचा प्रेमाचा परिपाक अतिशय उत्फूर्त. तिचं त्याच्या यशाची हेडलाईन. अनेक नायिकांसोबत त्याने पडद्यावर रोमान्स केला, त्याही देव आनंदसोबतच्या प्रेम दृश्यात हा तर अभिनय आहे हेच विसरल्या असतील. पडद्यापलिकडेही त्याची रंगलेली प्रेम प्रकरणे आजही रंगवून, खुलवून सांगितली जातात. अर्थात, सुरय्या व त्याच्या प्रेम प्रकरणाच्या गोष्टी अनेक. (त्यावरच एकादा चित्रपट काढावा असे अजूनही कोणाला का बरे वाटले नसेल? भरपूर नाट्य आहे यात.)

असा प्रेम पुजारीच्याच प्रगती पुस्तकातील सर्वात कमी गुण मिळाल्याने अनुत्तीर्ण झालेला चित्रपट चक्क प्रेमपट असावा? इश्क इश्क इश्क हा देव आनंदचा सर्वाधिक अपयशी चित्रपट. पडद्यावर येतोय तोच त्याला रसिकांनी पूर्णपणे नाकारले.

ही गोष्ट घडली, गुरुवार १४ नोव्हेंबर १९७४ रोजी. त्या दिवशी हा चित्रपट मुंबईत प्रदर्शित झाला. त्या अपयशाला पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील. खुद्द देव आनंदचे भक्तही या चित्रपटाच्या आसपास गेले नाहीत.

दक्षिण मुंबईतील मेट्रो या चित्रपटगृहात गुरुवारी नवीन चित्रपट प्रदर्शित होण्याची प्रथा आहे आणि जवळपास प्रत्येक चित्रपट निर्माता व दिग्दर्शकाला मेन थिएटरच्या फर्स्ट डे फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट काय आहे, त्यांना आवडला की नाही याचं भारी कुतूहल, उत्सुकता, तणाव असे. (ही पूर्वीची हुकमी गोष्ट. आता नवीन चित्रपट प्रदर्शित होतोय नि कोणी पाहतोय न पाहतोय त्याने किती कोटी कमावले याच्या बातम्या. चित्रपटाला विक्री मूल्य आल्यावर रसिक प्रेक्षकांना काय वाटतेय हे फार कोणी सिनेमावाला जाणून घेत असेल असे वाटत नाही.)

'इश्क इश्क इश्क' प्रदर्शनाच्या दिवसाचा एक किस्सा प्रसिद्ध आहे. फर्स्ट शोसाठीचा चित्रपट रसिक उत्साहाने मेट्रो चित्रपटगृहात येत आहेत असा देव आनंदला त्याच्या सांताक्रूझ पश्चिमेकडील खिरा हाऊस येथील कार्यालयात वितरकाचा फोन येताच तो सुखावला आणि ते स्वाभाविकच होते. प्रेम पुजारी (१९७०)पासून चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकल्यावर देव आनंदला हरे राम हरे कृष्ण (१९७२)च्या दिग्दर्शनात रौप्य महोत्सवी यश प्राप्त झाले. (मुंबईत गंगा चित्रपटगृहात या चित्रपटाने खणखणीत पंचवीस आठवड्यांचा मुक्काम केला)... तसे यश हीरा पन्ना (१९७३)ला मिळाले नाही. हीरा पन्नाच्या ट्रायल खूप झाल्या तरी वितरक मिळत नसल्याने नवकेतन फिल्म अशा नावानेच चित्रपट वितरण केले. त्या चित्रपटाला फारसे यश मिळाले नाही म्हणून देव आनंद गोंधळला, निराश झाला असे अजिबात नाही. तो त्याचा स्वभाव नव्हता. निराश देव आनंद ही त्याची अजिबात ओळख नव्हती. अधिक उत्साहात त्याने नेपाळला जाऊन इश्क इश्क इश्कची निर्मिती व दिग्दर्शन केले होते. चित्रपटाचे नाव त्याच्या प्रतिमेला (इमेज) साजेसे.

मेट्रोतील पहिला खेळ संपल्यावर अतिशय निराश होऊन बाहेर पडत असलेल्या रसिकांचे चेहरे, कुजबुज यातून पब्लिक रिपोर्ट स्पष्ट होता (तो मध्यंतरलाच लक्षात आला होता आणि पडद्यावर गाणे सुरू होताच चहापान, सिगारेट, टॉयलेट यासाठी बाहेर पडत असलेल्या रसिकांवरून शिक्कामोर्तब होत होता. पूर्वी पिक्चरमध्ये किती दम आहे अथवा नाही हे अशा गोष्टीतून सुचित होत असे. चित्रपटाच्या दुनिया अशाच अनेक छोट्या छोट्या गोष्टींतून गुंफलीय.)

...शो सुटलाय या अंदाजानुसार नवकेतन फिल्मच्या कार्यालयातील फोन वाजण्याची देव आनंदची प्रतीक्षा ट्रिंग ट्रिंग या घंटेने संपली... पलीकडून वितरक जे सांगत होता त्यावरून देव आनंद अधिकाधिक निराश होत होत गेला. त्याचा हा सर्वाधिक बजेटचा आणि मेहनतीचा हा चित्रपट होता. आपला चित्रपट रसिकांना अजिबात आवडलेला नाही, फ्लॉप झाला आहे हे देव आनंदला समजले होते, उमजले होते. काही क्षण तो बैचेन राहिला, चेहऱ्यावरचे भाव उतरले, तो अस्वस्थ झाला... पण, पण... आपल्या ऑफिसबाहेर येत आपल्या सहकाऱ्यांना नेहमीच्याच अतिशय उत्साहात म्हणाला, माझ्याकडे आपल्या नवीन चित्रपटाची पटकथा तयार आहे. आपण लवकरच आपल्या नवीन चित्रपटाची घोषणा करतोय आणि मेहबूब स्टुडिओत मुहूर्त करतोय...

देव आनंद कायमच म्हणायचा, मी मागे वळून पाहत नाही. मी चित्रपटाच्या यशापयशात अडकून पडत नाही हे त्याचे म्हणणे असे खरे ठरते. त्याने देस परदेसच्या निर्मिती व दिग्दर्शनाला सुरुवात केलीदेखील.

...न आवडावे असे इश्क इश्क इश्कमध्ये होते तरी काय? लहानपणापासून गीत संगीताची आवड असलेल्या धूनची (देव आनंद)च्या प्रेमाची ही गोष्ट. नेपाळमधील डोंगरमाथ्यावर घडते. धून कलिम्पोंग शाळेत संगीत शिक्षक आहे. त्याचे व पम्मी शबाना आझमी) यांच्या प्रेमाचे रुपांतर तिच्या नातेवाईकांच्या विरोधामुळे लग्नात होत नाही. म्हणून तो निराश होऊन नवीन आयुष्य जगण्यासाठी नेपाळमधीलच मठ येथे जातो. तेथे पहाड (प्रेमनाथ) याच्या हॉटेलमध्ये तो राहतो. पहाड हा सदैव दारू पिण्यात आनंद घेणारा. त्याला सहा मुली असतात त्यातील पूजा (झीनत अमान) हिच्याशी झालेल्या ओळखीचे रूपांतर प्रेमात होते. गीत संगीत नृत्य होते आणि ते लग्न करणार तोच त्यांचे जवळचे नाते आहे असे दिसून येते. प्रत्यक्षात तसे नसते आणि मग क्लायमॅक्सला त्यांचे लग्न होते.

गोष्टीत नाट्य नाही म्हणून पटकथेत ते नाही आणि तसे नाही म्हणून दिग्दर्शनही सरधोपट. असा चित्रपट पडायला वेळ तो काय लागतोय. देव आनंद व शबाना आझमी अशीही रोमॅन्टीक जोडी असू शकते? शोभू शकते? तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील हा चित्रपट. देव आनंद व झीनत अमान यांच्या पडद्यावरच्या व पडद्यामागच्या नातेसंबंधांवर गॉसिप्स मॅगझिनमधून बरेच काही चमचमीत लिहीले गेले. देव आनंदच्या दिग्दर्शनातील चित्रपटावर एक प्रकारचा पाश्चात्यपणा दिसतो, त्यात झीनत अमान एकदम फिट्ट. ती देव आनंदमधील दिग्दर्शकापेक्षा त्याचं देव आनंदपण असण्यावर ती जास्त फिदा असावी असे या जोडीच्या चित्रपटात दिसते. मग तो चित्रपट प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित वॉरंट असू शकतो आणि बी. आर. इशारा दिग्दर्शित प्रेम शास्त्र असू शकतो, अगदी डार्लिंग डार्लिंग व कलाबाजही असू शकतो.

इश्क इश्क इश्कसाठी देव आनंदने भरपूर मेहनत घेतली. देव आनंदला एक चांगली सवय होती. कोणत्याही चित्रपटांच्या बाह्यचित्रीकरण स्थळी गेल्यावर शूटिंग संपल्यावर वा आपलं शूटिंग नसेल त्या दिवशी एक पेन व डायरी घेऊन फिरायला जायचे. त्यात काय काय पाहतोय, कोण कोण भेटतोय हे लिहून ठेवायचे. त्यातून होत असलेल्या ओळखीचा त्याला फायदा होई. हरे राम हरे कृष्णच्या वेळच्या भटकंतीत त्याला इश्क इश्क इश्कसाठीची शूटिंग स्थळे गवसली. तेवढ्यावरच शांत राहिल तो देव आनंद कसला? त्याने हेलिकॉप्टरमधून फिरुन नेपाळमधील दूरवरच्या डोंगरमाथ्यावरील स्थळे हेरली. छायाचित्रणकार फली मिस्त्री यांचीही नवीन आव्हाने स्वीकारण्याची तयारी होती. चित्रीकरण स्थळाचा विचार करुन शंभर जणांचे युनिट नेले. कलाकारही भरपूर होते. स्वत: देव आनंद आणि जोडीला झीनत अमान, कबीर बेदी, प्रेमनाथ, नादिरा, जीवन,इफ्तेखार, शबाना आझमी, झरीना वहाब, कोमिला विर्क, सत्यजित,त्रिलोक कपूर, सुधीर, नाना पळशीकर, ए. के. हनगल, जानकीदास. यात देव आनंदने आपला लंडन येथे सी. ए. असलेला भाचा शेखर कपूरलाही बोलावले. त्याचा हा पहिलाच चित्रपट. भूमिका मात्र किरकोळ. म्हणजेच त्याच्याही कारकिर्दीला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत.

चित्रपटाची जमेची बाजू एकच. आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत. अच्छे बच्चे नहीं रोते है (पार्श्वगायक किशोरकुमार), मुझको अगर इजाज़त हो तो (किशोरकुमार), टिमटिम चमका झिलमिल तारा (आशा भोसले व किशोरकुमार), वल्लाह क्या नजारा है (आशा भोसले, किशोरकुमार व सुषमा श्रेष्ठ) ही गाणी लोकप्रिय ठरली. त्या काळात रिदम हाऊसमध्ये लॉन्ग प्ले तबकडी आली, रेडिओ सिलोनवरील बिनाका गीतमालामध्ये नवीन गाणे आले की नवीन चित्रपट प्रदर्शनास सज्ज होतोय याचा जणू सिग्नल मिळे. देव आनंदच्या चित्रपटातील गाणी नक्कीच चांगली असणार यावर विश्वास होता (तो कालांतराने कायमचाच गेला). राहुल देव बर्मनचा तर हा सुगाचा काळ होता. इश्क इश्क इश्कची गाणी लोकप्रिय होत गेली, पण चित्रपटाला ती कधीच वाचवू शकली नाहीत. देव आनंदची भूमिका असलेले अमरजीत दिग्दर्शित तीन देविया व गॅम्बलर, शंकर मुखर्जी दिग्दर्शित महल, विजय आनंद दिग्दर्शित तेरे मेरे सपने, खुद्द देव आनंद दिग्दर्शित प्रेम पुजारी यांना फर्स्ट रनला गल्ला पेटीवर यश मिळाले नाही, मात्र गाणी लोकप्रिय असल्यानेच ते चित्रपट मॅटीनी शोला वा रिपीट रनला आल्यावर त्याच गाण्यांमुळे ते हाऊसफुल्ल होत. इश्क इश्क इश्कबद्दल तेही झाले नाही.

अरेरे, ज्याच्या रोमारोमात रोमान्स भरला होता, त्या देव आनंदचा प्रेमभरा असा इश्क इश्क इश्क सर्वाधिक फ्लॉप चित्रपट ठरावा? या चित्रपटात देव आनंदचं मन का रमले नसेल? त्याचं दिग्दर्शक अगदीच सपक का बरे झाले असेल?

जे झाले त्याला पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील, मात्र संगीतकार आर. डी. बर्मनमुळे या चित्रपटाचं अस्तित्व कायम राहिले. मुझको अगर इजाज़त होतो तो प्रेम का गीत सुनावू... देव आनंद प्रेम शैलीतील किशोरकुमारचे पार्श्वगायन. हे गाणे कितीही वेळा ऐकावे, पहावे, आठवावे, गुणगुणावे देव आनंदची प्रेमिक प्रतिमा डोळ्यासमोर येतेच तर मग आणखी काय हवे?

# विकासाचा वादा... आमदार प्रशांतदादा!





अधोरेखित



समाधान पाटील
samgpatil111@gmail.com

विधानसभेच्या रणांगणात घनघोर लढाया सुरू आहेत. राजांचे सेनापती आपले सैन्य घेऊन कूच करीत आहेत. अशा वेळी एक योद्धा प्रजेच्या कल्याणासाठी आरंभलेला विकासरूपी अश्वमेध यज्ञ अजेय राहावा याकरिता निर्धाराने पुढे जात आहे. या शूरविराचे नाव आहे आमदार प्रशांत ठाकूर! रयतेचे रक्षण, सुख-शांती आणि आत्मसन्मानासाठी हा प्रजाहितदक्ष भूपती सैनिक बनून अवितरपणे लढतोय...

आज पनवेल तालुका विविध प्रकल्पांमुळे जगाच्या नकाशावर आला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचे जाळे पसरले जात आहे, पण याच पनवेलमध्ये एकेकाळी अगदी मुलभूत सोयीसुविधांचा अभाव होता. अनेक भागांत रस्ते, पाणी, वीज या गोष्टींची वानवा होती. त्यामुळे लोकांना दैनंदिन जीवनात काम करणे जिकिरीचे बनले होते. भकास पनवेलला विकास काय असतो ते आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे पहायला, अनुभवायला मिळाले.

पनवेलच्या विकासपर्वाला आमदार प्रशांत ठाकूर नगराध्यक्ष झाल्यापासून प्रारंभ झाला. पूर्वी पनवेल ही छोटीसी नगरी होती. कमी लोकसंख्येत सारे काही जमून जायचे, पण एकविसावे शतक उजाडूनही येथे विकासाला भरपूर वाव असताना केवळ सक्षम व दूरदृष्टीचे नेतृत्व नसल्याने एकूणच सर्व परिस्थितीला खीळ बसली होती. यातून मार्ग काढत प्रशांत ठाकूर या ध्येयवेड्या युवा नेतृत्वाने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आश्वासक पावले टाकत वाटचाल सुरू केली आणि आपल्या कार्यकर्तृत्वाने पनवेलचा चेहरामोहरा बदलून टाकला. कामाची झलक दाखवून सन २००९मध्ये ते पहिल्यांदा आमदार बनले.

मिळालेल्या संधीचे सोने करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा आणली. गाव, खेडी, वाड्या, वस्त्या, वसाहतींमध्ये स्वतःच्या आमदार निधीसह स्थानिक स्वराज्य संस्था, शासनाचे फंड अशा वेगवेगळ्या माध्यमातून जनतेला आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. याआधी असे काम तालुक्यात झाले नव्हते. त्यामुळे लोकप्रतिनिधी विविध प्रकारचे निधी वापरून विकासकामे करू शकतात हे येथील लोकांनाही कळले. याच उत्तुंग कार्याच्या जोरावर पुढे २०१४ आणि २०१९च्या विधानसभा निवडणुका जिंकत आमदार प्रशांत ठाकूर यांनी आमदारकीची दमदार हॅट्ट्रिक साधली.

आज आमदार प्रशांत ठाकूर यांनी डोंगराएवढे काम उभे केले आहे. अनेक वर्ष पनवेल शहर परिसरात नगर परिषद अस्तित्वात होती. या पालिकेद्वारेही कामे झाली, पण ती करताना मर्यादा येत होत्या. विशेषतः सोयीसुविधा पुरवताना यंत्रणेवर ताण येत असे. शिवाय निधीदेखील कमी पडत होता. हे लक्षात घेत नागरिकांना मुलभूत सेवा व्यवस्थितपणे मिळण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल नगर परिषदेची महानगरपालिका व्हावी, अशी मागणी शासन दरबारी केली आणि याचा पाठपुरावाही केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश येऊन पालिकेचे महापालिकेत रूपांतर झाले. यामुळे विकासाच्या कक्षा रूंदावल्या. अर्थात, अद्याप काही प्रश्न बाकी आहेत, ज्यावर काम सुरू आहे. नुकताच पनवेल महापालिका हद्दीतील मालमत्ता करावरील शास्ती (दंड) रद्द करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. आचारसंहिता संपल्यावर याबाबत कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

मध्यवर्ती पनवेलमध्ये नोकरी, रोजगाराच्या निमित्ताने आधीपासून मोठ्या प्रमाणात राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक वास्तव्यास आलेले आहेत. अलिकडच्या काही वर्षांत तर येथील नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. हल्ली ग्रामीण भागातदेखील मोठ-मोठ्या इमारती, गृहप्रकल्प उभे राहू लागले आहेत. एखादा भाग असा विकासाच्या केंद्रस्थानी आल्यावर साहजिकच काही समस्याही निर्माण होत असतात. प्रामुख्याने वीज, पाण्याचा वापर वाढून तुटवडा जाणवतो. इतरही सेवांवर परिणाम होतो. त्यामुळे आधी केलेले नियोजन कालांतराने तुटपुंजे ठरते. अशा वेळी नव्याने तजवीज करावी लागते, याची जाणीव कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांना आहे. म्हणूनच ते सदैव मतदारसंघात ठिकठिकाणी दौरा करून तेथील स्थितीचा आढावा घेत असतात व निर्माण झालेल्या समस्येचे निराकरण कसे करता येईल या दृष्टीने तेथील लोकांना सोबत घेऊन काम करतात. एखादा प्रश्न स्थानिक असेल तो तालुका, जिल्हा पातळीवर पाठपुरावा करून मार्गी लावला जातो आणि राज्याशी निगडीत असल्यास तो मंत्रालय स्तरावर जाऊन सोडवण्याचाही प्रयत्न ते करतात.

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडायचा झाल्यास पानेच्या पाने भरतील. आज ज्या पनवेल एसटी स्टॅण्डसमोरील उड्डाणपुलावरून लोक आपली वाहने घेऊन जातात तो उड्डाणपूल आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगराध्यक्ष असतानाच तत्कालीन शासनाच्या माध्यमातून करून घेतला होता. त्यामुळे शहराच्या प्रवेशद्वारावरील वाहतूक कोंडी आणि अपघात कमी होण्यास मदत झाली. नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी उपजिल्हा रुग्णालय साकारले. सर्व शासकीय सेवा एकाच छताखाली असाव्यात, जेणेकरून नागरिकांच्या वेळ व पैशांचा अपव्यय टळेल यासाठी प्रशासकीय भवनाची निर्मिती, न्यायालयाची नवीन इमारत, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती शिवसृष्टी, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह अशा अनेक वास्तू पनवेलमध्ये दिमाखात उभ्या राहिल्या. ज्या वडाळे तलाव परिसरात लोक आवर्जून जाऊन दोन घटका विसावा घेतात आणि स्वतःसह कुटुंब, मित्रपरिवाराचा आनंद द्विगुणित करतात त्या तलावाचेही सुशोभीकरण याच कार्यतत्पर नेत्यामुळे झाले आहे. शहरातील इतरही तलाव सुशोभित होत असून याद्वारे तलावांचे शहर अशी असलेली पनवेलची ओळख जपली जात आहे. रस्ते, गटारे, उद्याने, हायमास्ट दिवे यांसारख्या कामांची तर गणतीच करता येणार नाही.

आतापर्यंतची सर्व कामे सोडाच, पण अलिकडच्या पाच वर्षांची द्यायची झाली तरी मोठी जंत्री होईल. २०२०मध्ये वैश्विक महामारी कोरोनाचे संकट आले. साध्या डोळ्यांनाही न दिसणाऱ्या कोविड-१९ नामक विषाणूने अक्षरशः होत्याचे नव्हते केले. सुमारे सलग दोन वर्ष त्याचा प्रकोप सुरू होता. अशा परिस्थितीत भले भले पुढारी घरी बसले होते, परंतु लढवय्ये आमदार प्रशांत ठाकूर लोकांच्या मदतीसाठी आघाडीवर होते. त्यांनी गोरगरीबांना अन्नधान्याचे वाटप केले. काही ठिकाणी अन्नछत्रे उघडली. लसीकरण केंद्र सुरू केली. लोकांनी घरी सुखरूप पोहचावे म्हणून पास उपलब्ध केले. तेव्हा कोरोनाने इतकी दहशत निर्माण केली होती की अनेक जण घराबाहेर पडायलाही घाबरत असत. अशा वेळी आमदार प्रशांत ठाकूर रुग्णांना भेटण्यासाठी पीपीई किट घालून थेट रुग्णालयात गेले होते. यावरून त्यांची जनतेप्रती संवेदना लक्षात येते.

क्रियाशील आमदार प्रशांत ठाकूर सतत कार्यमग्न असतात. सकाळी लवकर उठून रात्री उशिरापर्यंत पनवेल आणि पनवेलकरांच्या भल्यासाठी झटत असतात. पनवेलसाठी अजून खूप काही करण्याची तळमळ व ऊर्मी त्यांच्यामध्ये आहे. त्यांच्याच पाठपुराव्यामुळे न्हावाशेवा पाणीपुरवठा योजनेची क्षमता वाढून पनवेल महापालिका क्षेत्रात दुपटीने पाणी पुरविले जाणार आहे. अखंड वीजपुरवठ्यासाठीही उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यावर काम चालू आहे. पनवेल शहरातील एसटी बस आगाराच्या कामाला सुरुवात होणार आहे. कळंबोली सर्कल येथील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी जंक्शन उभारण्यास निधी मंजूर झाला आहे. तेही काम लवकरच सुरू होईल.

एवढी कामे करूनही आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रसिद्धीची हाव नाही की, टीका-टिपण्णीचा त्यांच्यावर परिणाम होत नाही. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर जसा क्रिकेटच्या मैदानात उतरल्यावर खेळपट्टीचा अंदाज घ्यायचा, गोलंदाजाची चाचपणी करण्यासाठी एक-दोन चेंडू सोडून द्यायचा आणि प्रतिस्पर्धी हवेत गेल्यावर चौकार, षटकार मारून त्यांना त्यांची जागा दाखवून द्यायचा; अगदी तशाच प्रकारे आमदार प्रशांत ठाकूर आपल्या कामावर लक्ष केंद्रित करून मार्गक्रमण करीत असतात. विरोधकांनी यॉर्कर, बाऊन्सर चेंडू टाकून कितीही अडथळा आणण्याचा प्रयत्न केला तरी ते ध्येयापासून विचलित होत नाही. योग्य वेळ येताच तडाखेबंद विकासकामांनी विजयश्री खेचून आणतात.

स्वच्छ चारित्र्य, निष्कलंक व्यक्तिमत्व आणि आपल्या कामावर ठाम असलेला कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपात पनवेलला लाभलाय हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. आजच्या घडीला तरी त्यांच्याइतक्या अफाट क्षमतेने काम करणारा दुसरा पर्याय दिसत नाही. लोकशाहीत आपले म्हणणे मांडण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, पण प्रचंड प्रमाणात विकासकामे होऊनदेखील अमुकच झाले नाही, तमुक कधी होईल असे म्हणत आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे बोट दाखवणाऱ्या विरोधक, टीकाकारांनी आधी आपण किती कामे केली आहेत हे प्रामाणिकपणे सांगावे.

सुज्ञ पनवेलकरांना विकास हवा आहे आणि तो आमदार प्रशांत ठाकूरच करू शकतात. त्यामुळे जनताजनार्दनाच्या आशीवार्दाने आमदार प्रशांत ठाकूर यंदा विजयाचा चौकार लगावतील ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

# ‘आमदार रविशेठ पाटील यांना पिंगोडेमधून मताधिक्य देणार’



**नागोठणे : बातमीदार**

आमदार रविशेठ पाटील यांना आमच्या पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीतून प्रचंड मताधिक्य मिळणार असल्याचा विश्वास पिगोंडे ग्रामपंचायतीचे सरपंच राष्ट्रवादीचे युवा नेते संतोष कोळी यांनी आमदार रविशेठ पाटील यांच्या उपस्थितीत व्यक्त केला.

आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीतील वेलशेत व आंबेघर या गावात प्रचार फेरी काढण्यात आली या प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आमचे नेते राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे साहेब यांच्या आदेशाने आम्ही कार्यकर्ते महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांना निवडून आणण्यासाठी आमच्या वेलशेत आंबेघर या गावात घरोघरी जाऊन मतदारांच्या भेट घेऊन त्यांना खासदार सुनील तटकरे व खासदार धैर्यशील पाटील व आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या गावात केलेली विकासकामे सांगत आहेत. आपल्या गावाचा विकास करायचा असेल तर या विधानसभा निवडणुकीत रविशेठ पाटील यांना निवडून देणे किती गरजेचे आहे हे समजावून सांगत आहोत, असे युवा नेते संतोष कोळी म्हणाले.

या प्रचार फेरीत आमदार रविशेठ पाटील, ललितशेठ पाटील, पेणच्या नगराध्यक्षा प्रितमताई पाटील, राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, पिगोंडे सरपंच संतोष कोळी, राष्ट्रवादी नागोठणे शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, ज्येष्ठ नेते सुधाकर पारंगे, भाजप नेते राजेंद्र लवटे, विठोबा माळी, माजी उपसरपंच सखाराम घासे, नाना बडे, शांताराम माळी, यादव माळी, राष्ट्रवादी युवा नेते रोशन पारंगे, महेंद्र तरे, अंकुश ताडकर, सुमित पाटील, सुनील बडे, अशोक पाटील, किशोर पाटील, मनोज ताडकर, पुंडलिक ताडकर, संतोष ताडकर, जाखमाता एमआयजी गृप, श्री स्वामी समर्थ कलामंच व ग्रामस्थ वेलशेत आंबेघर ग्रामस्थ व महिला वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

# ‘पेणमध्ये रस्त्याचे काम पूर्ण, मात्र विरोधक अपप्रचार करताहेत’

**पेण : प्रतिनिधी**

निवडणूक म्हटल्यानंतर शाब्दिक हल्ला, प्रतीक्ष्या होत असतो. तसाच काहीसा प्रकार पेण विधानसभा मतदारसंघात पहायला मिळत आहे. हर्षा कन्स्ट्रक्शनचे मालक यांना २१ एप्रिल २०२३ रोजी दिलेल्या कार्यारंभ आदेशाच्या प्रतिचा फोटो समाजमाध्यमांवर टाकून खवसावाडी ते तांबडी हा रस्ता तयार केलेला नाही, असा अपप्रचार सुरू आहे. याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना हर्षा कन्स्ट्रक्शनचे बांधकाम अभियंता विवेक पाटील यांनी सांगितले की, समाजमाध्यमांवर फिरत असणारी पोस्ट ही खोटी आणि दिशाभूल करणारी आहे.

खयसावाडी ते तांबडी हा रस्ता दोन वर्षांपूर्वी पूर्ण झालेला आहे. त्यावर दोन पावसाळे गेल्याने रस्त्याची माती वाहून गेली असेल, परंतु आम्ही वेळोवेळी जेसीबीच्या सहाय्याने ह्या रस्त्याची दुरुस्ती केली आहे. खरं पाहता या कामाचा विरोधकांनी अंदाजपत्रक बघावे आणि हे काम अंदाजपत्रकानुसार झालाय की नाही याची खात्री करावी. अंदाजपत्रकामध्ये डोंगर फोडून कटींग करणे, ज्या भागात खड्डे असतील तेथे भराव करणे, ओढ्यानाल्यांना पाईप बसविणे, तसेच रस्त्याची पिंचिंग करणे, यांचा समावेश होता आणि त्या बाबी आम्ही पूर्ण केलेल्या आहेत.

मी कंपनीचा जबाबदार कर्मचारी असल्याने हे पूर्ण जबाबदारीने सांगतो, चुकीच्या पध्दतीने काम करून मला माझ्या कंपनीचे व कंपनीच्या मालकाचे नाव खराब करायचे नाही. त्यामुळे पुर्ण काम योग्यप्रकारे झालेले आहे. जर अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण झाले नसते तर अधिकारी वर्गाने कामाचे बिल कसे अदा केले असते. पुढे अभियंता विवेक पाटील यांनी सांगितले की, फक्त आणि फक्त हर्षा कन्स्ट्रक्शनचे मालक अनिरूध्द पाटील हे आमदार रविशेठ पाटील यांचे चिरंजीव असल्याने निवडणूकीच्या काळात बदनामी करण्याचे षडयंत्र आहे. ज्या संतोष ठाकूर यांनी हे षडयंत्र केले आहे त्यांच्या विरुध्द आम्ही न्यायालयात अब्रु नुकसानीचा दावा करणार आहोत. मी या कंपनीच्या इंजिनियर या नात्याने सर्वांना विनंती करीन की नकी घटनास्थळावर जाऊन अंदाजपत्रकानुसार काम पुर्ण झालेले आहे की नाही याची खात्री करून घ्यावी.


आपल्याला गरज पडल्यास आम्ही तुमच्या सोबत घटनास्थळी केव्हाही यायला तयार आहोत त्यामुळे नंतरच समाज माध्यमांवर फिरणाऱ्या पोस्टचा विचार करावा, अशी माझी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिर्षीच्या वतीने नागरिकांना नम्र विनंती आहे. झालेल्या कामाचे छायाचित्र प्रसार माध्यमांना देत आहे. याचीही आपण खात्री करून घ्यावी. खरे काय आणि खोटे काय हे जनतेला समजणे गरजेचे आहे एवढीच इच्छा.

खवसावाडी रस्त्याबाबत हर्षा कन्स्ट्रक्शनचे अभियंता विवेक पाटील यांच्या पत्रकार परिषदेनंतर जि. परिषदेचे पेण शाखेचे उपअभियंता प्रकाश गात्ति यांच्याशी भ्रमंती ध्वनीवरून संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, खवसावाडी ते तांबडी हा रस्ता दोन वर्षांपुर्वी झालेला आहे. पहिल्या टप्प्यात या रस्त्याचे बेस तयार करणाचे काम होते यामध्ये रस्ता कटिंग करणे, खड्डे असतील तिथे भराव करणे, नाले ओहळ या ठिकाणी पाईप टाकणे तसेच पिर्चिंग करणे ही कामे होती ती १०० टके पूर्ण झालेली आहेत. मंजूर आराखड्यामध्ये कोठेही काटकसर झालेली नाही. दोन वर्षाच्या पावसामुळे रस्ता मातीचा असल्यामुळे उतारावर वाहून गेला आहे. हे मी मान्य करतो, परंतु वेळोवेळी आम्ही ठेकेदाराकडून रस्त्याची डागडुजी करून घेतलेली आहे तसेच डांबरीकरणासाठी आम्ही जास्तीच्या निधीची मागणी केली होती परंतू ती निधी मंजूर न झाल्याने डांबरीकरण होउ शकला नाही, मात्र हर्षा कन्स्ट्रक्शने रस्त्याचे केलेले काम १०० टके अंदाजपकानुसार झालेले आहे

**संतोष ठाकूर यांना त्यांच्या भ्रमंती ध्वनीवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. १०० टक्के रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे.**

**–प्रकाश गावित, उपअभियंता, बांधकाम जिल्हा परिषद, पेण**







# विकास ही महायुतीची जमेची बाजू –बेबीशेठ

**खोपोली : प्रतिनिधी**

कर्जत खालापूर मतदारसंघात गेल्या अडीच वर्षात विद्यमान आमदार व महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी आणल्याने सर्व भागात विकासाची गंगा आली असल्याचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते बेबीशेठ सॅम्युअल यांनी प्रतिनिधीशी बोलताना दावा केला आहे.



या वेळी शिवसेना शिंदे गटाचे रायगड जिल्हा सचिव रॉबिन सॅम्युअल, माजी नगरसेविका जिनी सॅम्युअल व महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. राज्य शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना आमदार थोरवे यांनी मतदारसंघात राबवल्या आहेत रस्ते असो, पाणी योजना, ग्रामीण भागात दळणवळण योजना, लाडकी बहीण योजना व अनेक योजना राबविण्यासाठी थोरवे यांचा प्रामाणिक प्रयत्न राहिला आहे. मागील दोन वर्षांचा कालावधी हा कमी पडला असून, आगामी काळात जनतेचा थोरवे यांना पाठिंबा मिळेल, असा विश्वास त्यांनी बोलताना व्यक्त केला.

महेंद्र थोरवे यांच्या कामावर जनता खुश असून दिवसेंदिवस त्यांच्या कार्यालयात अभूतपूर्व प्रवेश सोहळा संपन्न होत आहे. जो उमेदवार प्रामाणिकपणे काम करतो त्याच्यामागे जनता उभी राहते, विरोधकांकडे दाखवण्यासारखे कामच नसल्यामुळे जनतेचे मन विचलित करण्यासाठी वारंवार नेरेटिव्ह वातावरण पसरवण्याचा प्रयत्न ते करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला. कर्जत खालापूर मतदार संघातील जनता थोरवे यांच्या पाठीशी राहतील, असाही विश्वास त्यांनी शेवटी व्यक्त केला.

## निवडक

### दोन वाहनांचा अपघात, एक जखमी

**खालापूर :** मुंबई–पुणे एक्सप्रेस वेचे मुंबई लेनवर बोरघाटातील खोपोली बायपास जवळ. टेम्पोचालक अफसर अली खान (वय २९,रा.अंधेरी) हा टेम्पो पुणेकडून मुंबई दिशेने घेऊन जात असताना ब्रेक फेल झाला आणि त्याची धडक समोरील ट्रकला बसली. त्या अपघातात टेम्पोची केबीन दबल्याने चालक केबीनमध्ये अडकून पडला. क्रेनच्या सहाय्याने वाहने बाजूला करून केबिनमध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढले. चालकाचे दोन्ही पायाला गंभीर जखम झाल्याने एमजीएम कामोठे येथे दाखल करण्यात आले. अपघातग्रस्त वाहने बाजूला काढून वाहतूक सुरळीत करण्यात आली.



### शाळांना १०० संगणक वाटप




**माणगाव :** पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील ११ शाळांना एकूण १०० संगणक संचांचे वाटप केले आहे. यामध्ये १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. हा उपक्रम शिरवली, कडापे, कांदळगाव, भाले, निजामपूर, साई, उतेखोलवाडी, माणगांव, पाटणूस, विळे या गावांतील शाळांमध्ये राबवण्यात आला. या उपक्रमाला स्थानिक समुदायाकडून भरभरून प्रतिसाद मिळाला आहे.

# कर्जतची जनता विकासाला पाठिंबा देणारी –आमदार थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात झालेला विकास जनतेसमोर आहे. सर्वसामान्य जनतेला विकासाची जाणीव झाली आहे. संपूर्ण मतदारसंघात उत्साह पाहायला मिळत आहे. महिला भगिनी युवक असतील सर्व सामान्य जनता प्रचारात उतरली आहे. निवडणुकीला सामोरे जात असताना विकासकामांची पोच पावती दिली आहे, असा विश्वास महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला.



कर्जत येथील लोकमान्य टिळक चौकात महायुतीची प्रचाराची कॉर्नर सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी महायुतीचे उमेदवार आणि आमदार महेंद्र थोरवे, भाजपचे गोवा राज्यातील आमदार आणि भाजप प्रभारी संकल्प अमोणकर, आरपीआय कोकण संघटक राहुल डाळिंबकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती पुंडलिक पाटील, माजी सभापती तानाजी चव्हाण, शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर, जिल्हा संघटक संभाजी जगताप, भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, तालुका अध्यक्ष राजेश भगत, माजी नगराध्यक्ष शरद लाड, भाजपचे प्रदेश प्रतिनिधी सुनील गोगटे, शिवसेना उप जिल्हा प्रमुख भाई गायकर, शिवराम बदे, महेंद्र निगुडकर, अतुल बडगुजर आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

भाजप जिल्हा चिटणीस रमेश मुंढे यांनी, आमच्या महायुतीच्या आमदारांनी मागील पाच वर्षांत २९६० कोटींची कामे आम्ही केली आहेत. ती कामे केली नाहीत असे वाटत असेल तर तुम्ही आमच्या महायुतीवर न्यायालयात रिट दाखल करा, असे आव्हान दिले.

शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर यांनी, शासनाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या योजना घेवून आम्ही गाव वाडी वस्तीत गेलो आणि त्यावेळी महिला वर्ग महायुतीच्या पाठीशी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचे जाहीर केले आहे. आम्ही आमचा अहवाल प्रकाशित केला आहे,तो अहवाल ८४ पानांचा अहवाल वाचा आणि विकास कामांची यादी वाचा. मतदारसंघात निवडणूक लढवणार दोन्ही उमेदवार हे विरोध करायचा म्हणून विरोध करीत आहेत. काही व्हिजन नाही आणि आहे म्हणत असाल तर तुम्ही अडीच वर्षात काय केले हे जाहीरपणे सांगावे, असे आवाहन केले.

राजेश लाड यांनी, आम्ही कधी काळी विरोधी मताचे होतो तरीदेखील आम्ही या मतदारसंघात आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून केलेली विकास कामे आम्ही नाकारली नाही. तुम्ही ५ नोव्हेंबर रोजी अदृश्य शक्तीविरोधात तुम्ही थेट उभे राहिले यामुळे मी तुमचा फॅनदेखील झालो आहे. त्याच अदृश्य शक्ती यांनी सुरेश लाड यांना अडचणीत आणले, परंतु भारतीय जनता पक्षात प्रवेश करून आम्ही पुन्हा मुख्य प्रवाहात आलो आहोत, असे स्पष्ट केले.

# माणगावमधून आदिती तटकरेंना प्रचंड मताधिक्य देणार –नवगणे

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाच्या महायुतीच्या उमेदवार मंत्री आदिती तटकरे यांना माणगाव तालुक्यातून प्रचंड मतांची आघाडी देऊन सलग दुसऱ्यांदा त्यांना विधानसभेवर निवडून पाठविणार, असा विश्वास माणगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते काका नवगणे यांनी तालुक्यात काढलेल्या आदिती तटकरे यांच्या प्रचार फेरीदरम्यान प्रसार माध्यमांजवळ बोलताना व्यक्त केला.

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची निवडणूक येत्या २० नोव्हेंबर रोजी होत असून या निवडणुकीच्या निमित्ताने माणगाव तालुक्यात महायुतीच्या उमेदवार अदिती तटकरे यांनी गाव बैठका, प्रचार रॅली व घर टू घर मतदारांच्या गाठी भेटी यावर भर दिला आहे. अदिती तटकरेंना श्रीवर्धन मतदार संघातील माणगाव, तळा, रोहा, म्हसळा, श्रीवर्धन या पाचही तालुक्यांतून मतदारांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभत आहे.

माणगाव तालुक्यात अनेक गावांतून आदिती तटकरे यांच्या प्रचार रॅलीला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून आदिती तटकरे या तालुक्यातील नागरिकांशी निवडणुकीच्या निमित्ताने संवाद साधत आहेत. आदिती तटकरे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने माणगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष काका नवगणे यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले की, आमच्या इंदापूर गावासह संपूर्ण विभागात तसेच माणगाव तालुक्यात खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, अनिकेत तटकरे या तटकरे कुटुंबीयांनी मोठ्या प्रमाणात गाव, वाडी, वस्त्यांवर विकास कामे केली आहेत. याच बरोबर या तटकरे कुटुंबीयांनी आपल्या मतदार संघात सातत्याने जनसंपर्क ठेवल्याने याची जाणीव मतदार संघातील जनतेला निश्चितपणे आहे.

राज्याच्या महिला व बालविकास खात्याच्या मंत्री म्हणून काम करताना आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू झाली. या योजनेचा लाभ तालुक्यातील अनेक महिलांना मिळाला असून महिलांना दरमहा १५०० रुपये या महायुतीच्या सरकारमार्फत व अदिती तटकरे यांच्यामुळे मिळत आहेत. या योजनेमुळे तालुक्यातील महिलांमध्ये आदीती ताईंना मतदान करण्याची उत्सुकता असून तालुक्यातून प्रचंड मताधिक्य ताईंना मिळेल, असा विश्वास काका नवगणे यांनी व्यक्त केला.



# ‘केईएस’च्या विद्यार्थ्यांकडून मतदान जागृती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील के.ई एस इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त तसेच बालदिनाच औचित्य साधून संपूर्ण कर्जत शहरात मतदान जागृती करत भव्य अशा रॅलीचे आयोजन केले.

कर्जत नगरपालिकेसमोर सादर केलेल्या कार्यक्रमाचे नगरपालिकेच्या वतीने तेथील अधिकारी गायकवाड, पवार, लोखंडे मॅडम यांनीदेखील अगदी तोंडभरून कौतुक करून खाऊ वाटप केले. अशाप्रकारे अतिशय उत्साहात मतदान जनजागृती कार्यक्रम पार पडला.

संस्थेचे चेअरमन डॉ. अनिरुद्ध जोशी, सेक्रेटरी प्रवीण गांगल, खजिनदार मदन परमार सदस्य श्रीकांत मनोरे, सतीश पिंपरे, सदस्या भावना परमार, संतोषी परमार तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी, पर्यवेक्षक सुनील बोरसे आदी सह तसेच इयत्ता ६ वी ते ९ वीचे विद्यार्थी यांच्या उपस्थितीत ही भव्य रॅली झाली.



# आरसीएफ थळतर्फे मतदान जनजागृती रॅली

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) थळतर्फे सरखेल कान्होजी आंग्रे वसाहतीमध्ये शनिवारी (दि. १६) मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमात महा व्यवस्थापक मानव संपदा संजीव हरळीकर यांसह कर्मचारी व प्रशिक्षणार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते.

आगामी विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून नागरिकांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृती उपक्रम स्वीप कार्यक्रमांतर्गत राबविण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. या अनुषंगाने कारखान्यातील कामगारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने १९२ अलिबाग विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी आरसीएफ व्यवस्थापनाला एका पत्राद्वारे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत आरसीएफ थळ तर्फे सरखेल कान्होजी आंग्रे वसाहतीमध्ये मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात महा व्यवस्थापक मानव संपदा व प्रशासन संजीव हरळीकर, मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक (प्रभारी) महेश पाटील, वरिष्ठ मानव संपदा व्यवस्थापक प्रशांत म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक हितेश थळे (मानव संपदा विकास), वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांसह कर्मचारी व प्रशिक्षणार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते.

# गावी जाणाऱ्या मतदारांना रोखण्याची कसरत

## नवी मुंबईतील उमेदवारांना करावे लागणार अवघड काम

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

बेलापूर व ऐरोली या दोन्ही मतदारसंघांत यंदा अत्यंत चुरशीच्या लढती होणार असून यंदा मोठ्या पक्ष बदलाच्या घडामोडी घडल्या आहेत. त्यामुळे निवडणुकांना अधिक रंगत आली असून मतदानाच्या दिवशी आपल्या मूळ गावच्या मतदारसंघात जाणाऱ्या मतदारांना रोखण्याचे अवघड काम नवी मुंबईतील उमेदवारांना करावे लागणार असल्याचे चित्र आहे.

दोन्ही मतदारसंघांत माथाडी कामगारांची मतदारसंख्या मोठी आहे. बेलापूर ते ऐरोली-दिघापर्यंत माथाडी कामगार मोठ्या प्रमाणात राहत असून माथाडी मतदार हे मतदानासाठी आपल्या मूळ गावी जातात. यंदाच्या निवडणुकीतही माथाडींचे नेते व माथाडींशी संपर्कात असलेले पश्चिम महाराष्ट्रातील अनेक नेते निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अनेकांनी निवडणुका जाहीर होण्याच्या आधीच नवी मुंबईत आपल्या मूळ गावच्या मतदारसंघातील



मतदारांचे मेळावे नवी मुंबईत घेतले होते. २० तारखेला होणाऱ्या मतदानासाठी मूळ गावी जाण्यासाठी उमेदवारांनी वाहनांचीही सोय केली आहे. त्यामुळे आता नवी मुंबईत माथाडी मतदारांना थांबवण्यासाठी नवी मुंबईतील उमेदवारांना मोठी कसरत करावी लागणार आहे.

नेरूळ, सानपाडा, तुर्भे, वाशी, कोपरखैरणे, घणसोली ते अगदी ऐरोलीपर्यंतच्या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात माथाडी कामगार राहतात. या माथाडी कामगारांची नाळ आपल्या मूळ गावाशी व तेथील आमदारांशी जोडलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात माथाडी कामगारांशी जवळील असलेले माथाडींचे नेते शशिकांत शिंदे हे कोरेगाव, मकरंद पाटील हे वाई-खंडाळा-

> वाई, महाबळेश्वर, कोरेगाव तालुक्यांतील माथाडी कामगार हे मतदानासाठी गावाला जाणार आहेत. त्या त्या ठिकाणच्या आमदारांनी त्यांना गावी नेण्यासाठी बसेसची सोय केली आहे. त्यामुळे माथाडी कामगार गावी जाणार हे निश्चित आहे.
>
> **-संतोष कोंढाळकर**, माथाडी सामाजिक कार्यकर्ते, वाई पश्चिम विभाग

महाबळेश्वर, संग्राम पाटील हे भोर, शंभुराजे देसाई हे पाटण, शिवेंद्र राजे भोसले हे सातारा, तर पृथ्वीराज चव्हाण हे कराड मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.

यामुळे या मतदारसंघातील आपले मूळ मतदार हे गावी मतदानाला आणण्यासाठी जवळजवळ या सर्वच उमेदवारांनी वाहनांची सोय केली आहे. त्यामुळे नवी मुंबईतील बेलापूर व ऐरोली मतदारसंघातून मूळ गावी मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांना रोखण्याचे काम दोन्ही मतदारसंघांतील उमेदवार कसे करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

यंदाची निवडणूक ही मोठ्या फरकाने नाही तर अत्यंत कमी मताच्या फरकाने निवडणुकीचे निकाल पाहायला मिळणार आहेत. त्यामुळे गावी मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांना रोखणे मोठे आव्हान ठरणार आहे.

नवी मुंबईत राहणाऱ्या माथाडी कामगारांची नाळ ही आपल्या मूळ गावाशी व आमदारांशी जोडली गेली आहे. त्यामुळे ते मतदानासाठी गावी जाणार हे निश्चित आहे. वाशी, कोपरखैरणे, घणसोली विभागांत माथाडी कामगारांची संख्या खूप मोठी आहे. माथाडी कामगारांशी जवळचा संपर्क असलेले पश्चिम महाराष्ट्रातील नेते आमदारकीला उभे आहेत. त्यामुळे माथाडी कामगार मतदानासाठी गावी जाणार हे निश्चित मानले जात आहे.

## हनी ट्रॅपद्वारे तरुणाला बेशुद्ध करून लुटले

नवी मुंबई : बातमीदार

तरुणीच्या इशाऱ्यावर तिच्यासोबत लॉजवर गेलेल्या तरुणाला लुटल्याची घटना एपीएमसी परिसरात घडली. या तरुणीने पेढा देऊन तरुणाला बेशुद्ध केले आणि त्यानंतर त्याच्याकडील ऐवज लुटून तेथून धूम ठोकली. दुसऱ्या दिवशी सकाळी तरुणाला जाग आल्यानंतर हा प्रकार उघड झाला. याप्रकरणी एपीएमसी पोलीस अधिक तपास करत आहेत.

शहरात प्रतिष्ठित व्यक्तींपासून सर्वसामान्यांनाही 'हनी ट्रॅप'मध्ये गळाला लावणाऱ्या टोळ्या सक्रिय आहेत. त्यांच्याकडून अनेकांना सोशल मीडियावर मैत्री करून भुरळ घालण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातच आता थेट लॉजवर बोलावून लुटणारी टोळीदेखील सक्रिय असल्याचे एपीएमसी परिसरातील प्रकरणातून समोर आले आहे. जुहूगाव परिसरात राहणाऱ्या २० वर्षीय तरुणासोबत एका तरुणीने फेसबुक मैत्री केली. त्यातून या तरुणीने त्याला एपीएमसी येथील एका लॉजवर बोलवले. तिच्या निमंत्रणाला भुलून हा तरुण त्याठिकाणी गेला. लॉजमधील खोलीत गेल्यावर या तरुणीने त्याला पेढा खायला दिला. तो खाताच काही वेळातच तो बेशुद्ध पडला.

सकाळी जाग आल्यानंतर तरुणाला अंगावरील दोन सोन्याच्या चेन व दोन मोबाईल लंपास झाल्याचे लक्षात आले. त्यावरून आपण 'हनी ट्रॅप'चा शिकार होऊन लुटलो गेल्याचे तरुणाच्या लक्षात आले. याप्रकरणी त्याने एपीएमसी पोलिसांकडे केलेल्या तक्रारीवरून तरुणीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मात्र या गुन्ह्यात तिच्यासह इतरांचाही समावेश असल्याचा अंदाज पोलिसांकडून व्यक्त होत आहे. त्यावरून पोलीस या टोळीचा छडा लावण्यासाठी सखोल तपास करत आहेत.

# पनवेलमध्ये त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पूजन

पनवेल : रामप्रहर वृत्त

श्री रामेश्वर देवस्थान आणि जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने शुक्रवारी (दि.१५) सायंकाळी दिपोत्सवाचे आयोजन केले होते. या उत्सवात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत पूजन केले.

भारतीय संस्कृती आणि परंपरांमध्ये कार्तिक महिन्याचे विशेष महत्त्व असल्याचे मानले जाते. कार्तिक पौर्णिमेला विष्णू आणि शंकराची भेट होते, असे मानले जाते. या दिवशी घरोघरी, अंगणात, मंदिरात दिवे लावण्याची पद्धत आहे. त्यानुसार त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त पनवेल मधील वडाळे तलावाजवळील प्राचीन रामेश्वर देवस्थानात शुक्रवारी दीपोत्सव साजरा करण्यात आला.

त्रिपुरारीं पौर्णिमेला भगवान शंकराने अखंड भूमीवरून जनतेला त्रास देणाऱ्या त्रिपुर राक्षसाच्या तीन पुत्रांचा वध





केला म्हणून त्रिपुर अरी अर्थात त्रिपुरारी पौर्णिमा असे म्हणतात, त्याचेच औचित्य साधून रामेश्वर महादेव मंदिरात भगवान शंकरापुढे आरती आणि त्रिपुर वात लावून उत्सव साजरा करण्यात आला. याचे आयोजन जाणीव एक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नितीन पाटील आणि मंदिराचे अध्यक्ष उमेश इनामदार यांनी केले होते.

या वेळी गोव्याचे माजी आमदार दयानंद सोपटे, पनवेल महापलिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जाणीव एक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नितीन पाटील, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, प्रसाद हनुमंते यांच्यासह मंदिराचे विश्वस्त, कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

## मतदान वाढीसाठी बिल्डरांनाही आवाहन

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

बिल्डर असोसिएशन आणि आर्किटेक्ट असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी त्यांच्या कार्यालयात काम करणारे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांनाही मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने दोन्ही असोसिएशनच्या बैठकीत करण्यात आले.

ग्रामीण भागाच्या तुलनेत नागरी भागात मतदानाची कमी असलेली टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने विधानसभा निवडणूक कार्यालयांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांनाही कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात आले आहे.

जनजागृतीपर बैठक नवी मुंबई बिल्डर असोसिएशन व नवी मुंबई आर्किटेक्ट असोसिएशन यांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आयोजित करण्यात आली होती. पालिका आयुक्तांनी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांमार्फत आपले सदस्य, कर्मचारी, कुटुंबीय व संपर्कात येणारे ग्राहक आणि नागरिक यांच्यापर्यंत मतदान करण्याचा संदेश पोहचविण्यात

> **नवी मुंबई बिल्डर असोसिएशन आणि नवी मुंबई आर्किटेक्ट असोसिएशन यांनीही मतदानाचे कर्तव्य प्रत्येक नागरिकाने पार पाडावे याकरिता आपल्या स्तरावरून जास्तीतजास्त प्रचार व प्रसार करावा.**
>
> **-डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

यावा व प्रत्येकाने मतदान करावे यासाठी प्रोत्साहित करावे असे सांगितले. बिल्डर व आर्किटेक्ट यांनी आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे तसेच वेळेत सवलत द्यावी, असेही आयुक्तांनी सूचित केले.

नागरिकांना त्यांचा मतदार क्रमांक व मतदान केंद्राचे ठिकाण शोधणे सोपे जावे याकरिता त्यांच्यापर्यंत हस्तपत्रके पोहचविली जात असून प्रत्येक सोसायटीवर ही माहिती सहजपणे उपलब्ध होईल, असा क्यू आर कोडदेखील पोस्टर्स स्वरूपात प्रसारित केला जाणार आहे.

# उरणमध्ये दिव्यांगांचे १०० टक्के गृह मतदान

## ८५ वर्षांवरील वृद्ध मतदारांचाही प्रतिसाद



उरण : प्रतिनिधी

उरण विधानसभेच्या निवडणुकीत मतदार संघातील गृहमतदानाला वृध्द आणि दिव्यांचा मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला असल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.उध्दव कदम यांनी दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये सर्व शासकीय विभागांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून समन्वयाने काम करण्याचे आदेश दिले आहेत.तसेच मतांची टक्केवारी वाढावी यासाठी दिव्यांग मतदार, ८५ वर्ष वयावरील ज्येष्ठ नागरिक यांना आयोगाने घरून मतदान करण्याची (होम वोटिंग) सुविधा दिली आहे.

दिव्यांग मतदारांचे १०० टक्के मतदान होईल या दृष्टीने नियोजन करावे. दिव्यांगांना सहजतेने मतदान करता यावे यासाठी त्यांना द्यावयाच्या सुविधा सर्व मतदान केंद्रांपर्यंत उपलब्ध करण्यात याव्यात असेही आदेश दिले आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांचे पालन करीत उरण विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील ६८ वृध्द मतदारांपैकी ६६ मतदारांनी गृह मतदान केले. यापैकी एक मतदार मयत तर एक मतदार आढळून आलेला नाही. मतदारसंघातील १६ दिव्यांगापैकी १६ दिव्यांगांनी गृहमतदान केले असल्याची माहिती उरण विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उध्दव कदम यांनी दिली.

वयोवृद्ध आणि आणि दिव्यांग मतदारांनी ज्या उत्साहाने मतदान केले त्याच उत्साहाने मतदारसंघातील सर्वांनी मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन उरण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांनी केले आहे.

## निवारा शेड उभारणीमुळे प्रवासी समाधानी

नवी मुंबई : प्रतिनिधी

नवी मुंबई मनपा परिवहन उपक्रमाने प्रवाशाच्या सेवेसाठी विविध मार्गांवर बस शेल्टर उभारणी केल्याने उन्हा पावसात प्रवास करणे सोईचे झाले आहे.

वाशी डेपो ते तुर्भे मार्गावरील आपण कमिटी पाठवून बँक ऑफ बडोदा, सेंट लॉरेन्स आणि एपीएमसी या ठिकाणी प्रत्येकी दोन शेल्टर लावलेले आहेत. येथून कल्याण, डोंबिवली, बदलापूर आणि मुंब्रा मार्गावर सहा बस मार्ग कार्यान्वित असून दैनंदिन ४३ बसेस द्वारे व १८७ फेऱ्यांद्वारे बस सेवा देण्यात येत आहेत तसेच बेलापूर, नेरूळ, खारघर, तळोजा आणि पनवेल या मार्गावर ८ बस मार्ग कार्यान्वित असून दैनंदिन ६७ बसेसद्वारे व २५३ फेऱ्यांद्वारे बस सेवा देण्यात येत आहे. या मार्गावरील कार्यान्वित बस मार्ग, बस संख्या व बस फेऱ्यांची संख्या पाहता प्रवाशांचे विभाजन होवून त्यांना बस मध्ये प्रवेश करणे सोयीचे व्हावे याकरिता प्रत्येकी दोन शेल्टरची उभारणी करण्यात आलेली असल्याचे परिवहन व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांनी सांगितले.

बधाई चौक, सान पाडा येथे आपले धर्मवीर संभाजी महाराज चौक या नावाचे शेल्टर आहे. तेथून मार्ग क्र. १८ (१४ बसेस) कार्यान्वित असून प्रवाशांना आता प्रवास करणे सोईचे झाले आहे.

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या विजयाचा गुलाल पुन्हा उडवू -पाटकर

नवी मुंबई : बातमीदार

नवी मुंबईचे शिवसेना संपर्कप्रमुख किशोर पाटकर यांची तातडीने बेलापुर विधानसभा मतदार संघाच्या जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. पाटकर यांनी आमदार मंदा म्हात्रे यांचे एकजुटीने काम करण्याची विनंती पदाधिकाऱ्यांना केली आहे. त्यानुसार शिंदे गटदेखील महायुतीत जोमाने प्रचारास उतरला आहे. मंदा म्हात्रे यांच्या विजयाचा गुलाल पुन्हा उडवू, असे पाटकर म्हणाले आहेत.



शिवसेनेच्या नवी मुंबई संपर्क प्रमुख किशोर पाटकर यांना बेलापुर विधानसभा क्षेत्राची जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिली आहे. त्यामुळे आता बेलापुर विधानसभेमध्ये पक्षाला स्थिरता आणणे, पक्ष वाढवणे तसेच महायुतीच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांना निवडून आणण्याचे किशोर पाटकर यांना शिवधनुष्य पेलावे लागणार आहे.

मुख्यमंत्र्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला त्यावर खरे उतरण्याचा प्रयत्न कामात करणार आहे. जे आमच्या शिवसेनेला सोडून गेले आहेत. त्यांना पक्षातून काढून टाकले आहे. त्या व्यतिरिक्त जे आहेत व महायुतीविरोधात काम करत आहेत त्यांच्यावर येत्या दोन दिवसांत पक्षादेश न मानल्याबद्दल कारवाई करण्यात येईल. आमदार मंदा म्हात्रे यांना निवडून आणण्यासाठी आम्ही दिवसरात्र मेहनत करत आहोत. संपूर्ण बेलापुर विधानसभा क्षेत्रातून त्यांना लीड आम्ही देऊ व २३ तारखेला विजयाचा गुलाल उडवू. ही महिला शक्ती विरुद्ध धनशक्ती, अशी लढाई आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार पदाधिकाऱ्यांनी रुसवे फुगवे बाजूला ठेवून महायुतीचे काम करावे यातच सर्वांचे हित आहे, असे किशोर पाटकर यांनी सांगितले.

## आय एम फिट इन्स्टिट्यूटतर्फे कार्यक्रम



पनवेल : रामप्रहर वृत्त

आय एम फिट इन्स्टिटयूटद्वारा झूम कार्यक्रम झाला. डेंनीप्रीत सिंग आयोजित या कार्यक्रमात अनेक कलाकारांची उपस्थिती होती. यामध्ये ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीडच्या राजदूतांनी या गौरव सोहळ्यात सहभागी होवून या अभियानाचा आवाज सर्व सामान्यापर्यंत पोहचवला.


या कार्यक्रमांत दिगज्ञ कलाकारांची विशेष हजेरी लाभली. या वेळी अनेक नृत्य आविष्कार सादर झाले. ईट प्ले रीड चा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र आहे हे या सर्व मान्यवारांच्या सन्मानाने दिसून येत आहे.

## राज्यस्तरीय रफी गीत गायन स्पर्धा

पनवेल : रामप्रहर वृत्त

ज्यांची गाणी ऐकत तीन पिढ्या लहानाच्या मोठ्या झाल्या त्या ज्येष्ठ, लोकप्रिय पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या जन्मशताब्दी सांगता वर्षानिमित्त द डिव्हाइन म्युझिक अनलिमिटेड आणि पनवेल कल्चरल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये राज्यस्तरीय रफी गीत गायन स्पर्धेचे आयोजन केले जात आहे.

ही स्पर्धा १६ ते ४० आणि ४१ व त्यापुढील अशा दोन गटात (केवळ हौशी पुरुष गायकांसाठी) दोन फेर्यांमध्ये होईल. दि. ८ डिसेंबर रोजी होणार्या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत स्पर्धकांनी मोहम्मद रफी यांनी गायिलेले हिंदी चित्रपटातील कोणतेही सोलो गाणे म्युझिक ट्रॅकवर



गायचे आहे. यातून अंतिम फेरीसाठी प्रत्येक गटातून दहा, म्हणजेच एकूण २० स्पर्धकांची निवड करण्यात येईल. या वीस जणांना ज्येष्ठ, अनुभवी आणि जाणकार संगीतज्ञांकडून गाण्यासंबंधात तर मार्गदर्शन मिळेलच, तसेच मायक्रोफोन टेक्निक्स, शब्दफेक, शब्दोच्चार, हावभाव यासंबंधात टीप्सही मिळतील. अंतिम फेरीत मात्र, स्पर्धकांनी निवडलेल्या दहा गाण्यांपैकी परीक्षक/आयोजक सांगतील ते एक गाणे (दोन अंतरे) प्रत्यक्ष वाद्यवृंदासह सादर करावयाचे आहे.

स्पर्धेची अंतिम फेरी रविवार २२ डिसेंबर २०२४ रोजी होईल. अंतिम फेरीनंतर लगेच निकाल जाहीर होऊन मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभही पार पडेल. या वेळी रफीसाहेबांची गाणी गाणाऱ्या काही निवडक व्यावसायिक गायकांना गौरविण्यात येईल. ३० नोव्हेंबर ही या स्पर्धेत भाग घेण्याची अखेरची तारीख आहे. अधिक माहितीसाठी सतीश गुणे (९८२०४९९४९८) अथवा जयंत टिळक (९८१९४०५२४५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा मॉर्निंग वॉकमध्ये नागरिकांशी संवाद





पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि.१६) पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे मॉर्निंग वॉकच्या अनुषंगाने नागरिकांशी संवाद साधला. त्यांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, भाजपचे अमित ओझे, केदार भगत, विनायक मुंबईकर, स्वप्निल ठाकूर आदी उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांना नवमतदार, युवा, महिलावर्गाचा पाठिंबा, तर ज्येष्ठांचा आशीर्वाद लाभत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेली विकासकामे आणि सामाजिक बांधिलकीतून केलेले समाजकार्य नेहमीच लोकहिताच्या दृष्टिकोनातून प्रेरणादायी ठरले आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वागत करून त्यांना समर्थन दिला जात आहे.

# जनतेच्या आशीर्वादाने चौथ्यांदा आमदार होऊन मंत्रीही होणार

## ◆ आमदार भरत गोगावले यांचा दृढ विश्वास



**पोलादपूर : प्रतिनिधी**

राजकीय, सामाजिक क्षेत्रात वावरताना आयुष्यातील एकही निवडणूक हरलो नाही. त्यामुळे गेल्या तीन वेळा आमदार झालो तसेच चौथ्यांदाही जनतेच्या आशीर्वादाने आमदार होऊन मंत्री होईन, असा दृढ विश्वास महाड विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना भाजप महायुतीचे उमेदवार भरतशेठ गोगावले यांनी व्यक्त केला.

महायुतीचे उमेदवार आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत पोलादपूर शहर आणि लोहारे जि.प. विभागातील शिवसैनिकांच्या मेळाव्याचे आयोजन पोलादपूर शहरातील शिवाजीनगर येथील मैदानात काढण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

या सभेस व्यासपीठावर राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस अपेक्षा कारेकर, तालुकाध्यक्ष विठोबा पार्टे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, तालुका अध्यक्ष तुकाराम केसरकर, एकनाथ कासुर्डे, वारकरी संप्रदायाचे तरुण प्रचारक ह.भ.प. भगवानमहाराज कोकरे, भाजपच्या रचना धुमाळ, तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव, नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, अर्थ व नियोजन सभापती अंकिता निकम, महिला बालकल्याण सभापती अस्मिता पवार, कॅप्टन मोरे, शहर प्रमुख सुरेश पवार, रिपब्लिकन पक्षाचे सुदास मोरे, तालुका प्रमुख निलेश अहिरे, पं.स. चे माजी सभापती महादेव निविलकर तसेच अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रारंभी पोलादपूरचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिरामध्ये राज्यात महायुतीच्या सत्तेसह आमदार गोगावले यांच्या विजयासाठी शहर प्रमुख सुरेश पवार यांनी नवस केला. या वेळी आमदार गोगावले आणि अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत काळभैरवनाथांना साकडे घालण्यात आले. यानंतर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून आमदार गोगावले यांची प्रचार मिरवणूक बाजारपेठेतून शिवाजीनगर येथील सभास्थानी निघाली.

नगरसेवक तथा पाणीपुरवठा सभापती प्रसाद इंगवले यांनी आमदार गोगावले यांचे रेड कार्पेट घालून जेसीबीतून पुष्पवर्षाव करून स्वागत केले. सभेत आमदार गोगावले पुढे म्हणाले की, गेल्या पंधरा वर्षात सरकारी योजनेची विकास कामे करताना महाड विधानसभा मतदारसंघात एकही गाव आणि वाडी शिल्लक राहिली नाही, जिथे आम्ही विकास कामे केली नाहीत. मतदारसंघातील सर्व गावांची, वाड्यांची नावे आम्ही तोंडपाठ सांगू शकतो, कारण आम्ही तिथे कामे केलेली आहेत. सर्वांच्या विशेषत: गोरगरीबांच्या हाकेला धावून जाणारा म्हणून भरतशेठला ओळखले जाते. ही सेवा करण्याची संधी चौथ्या वेळीदेखील जनता आम्हाला देईल याचा ठाम विश्वास आहे.

### पाठिंबा अन् पक्षप्रवेश

पोलादपूर नंदीवाले समाजाकडून या वेळी आमदार भरत गोगावले यांना पाठिंबा जाहीर करण्यात आला, तर तुर्भे बुद्रुक येथील शिवसेना उबाठा गटाचे कार्यकर्ते यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश घेण्यात आला. याशिवाय देवपूर, पैठण, गोळेगणी, तुर्भे येथील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

प्रास्ताविकात महाड कृउबा संचालक लक्ष्मण मोरे यांनी आपले उमेदवार आमदार भरत गोगावले हे केवळ महाड, पोलादपूर, माणगाव, रायगड जिल्हा, महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशात तसेच जगभरातील १२४ देशांमध्ये इंटरनेटद्वारे शिवसेना पक्षातील उठावाची दखल घेण्यात आली. त्यामुळे जगभर पोहचलेले नेते आहेत, असे सांगितले.

वारकरी संप्रदायाचे नेते ह.भ.प. भगवानमहाराज कोकरे यांनी आमदार भरत गोगावले यांचे भगव्याचा स्वाभिमान आणि धनुष्यबाणाची आण पायदळी तुडवली जात असताना त्या विरोधात उठाव करण्याची भूमिका घेतली याबद्दल अभिनंदन केले. देशात मोदी सरकार मोदी आले तसेच राज्यात भाजप शिवसेना महायुती सरकार येण्याची गरज आहे. आमदार गोगावले यांना पुन्हा निवडून देण्यासाठी सर्व उपस्थित बंधू भगिनींनी शपथ घेण्याची गरज आहे, असे कोकरे महाराजांनी सर्वांना हात उंचावण्याचे आवाहन केले.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी गुरुवारी संध्याकाळी झालेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जाहीर सभेचे वाभाडे काढताना आमदार गोगावले यांनी केलेला विकास बघण्याची दृष्टी तुमच्यामध्ये राहिली नसेल तर आमदार गोगावलेंचा कार्यअहवाल वाचायला देऊ, असे सांगून पोलादपूर तालुक्यातील विकासकामांचा आढावा घेतला.

चंद्रकांत कळंबे यांनीही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सभेला लक्ष्य केले. कर्नल किशोर मोरे यांनी जवानांसाठी झटणारे आमदार पुन्हा निवडून यावेत, असे आवाहन केले. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस अपेक्षा कारेकर तसेच अन्य मान्यवरांची समयोचित भाषणे झाली.

# चंद्र, सूर्य, तारे असेपर्यंत देशाचे संविधान बदलले जाणार नाही!

## खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन

**रोहे : प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीच्या चार महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीला सामोरे गेलो. राज्यासह देशभरामध्ये एक वेगळे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधक करत होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान देशामध्ये तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आलेले सरकार बदलेल अशी आवई उठवण्यात आली, पण जोपर्यंत चंद्र, सूर्य, तारे आहेत तोपर्यंत संविधान बदलले जाणार नाही, असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी केले.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रचारार्थ रोहा तालुक्यातील भुवनेश्वर येथे आयोजित प्रचार सभेत खासदार तटकरे बोलत होते. या सभेस राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, सरचिटणीस सुरेश मगर, उपाध्यक्ष शंकर भगत, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, दीपिका चिपळूणकर, माजी उपसभापती अनिल भगत, दत्ता चव्हाण, उस्मान रोहेकर, अप्पा देशमुख, सरपंच अमित मोहीते, उपसरपंच स्वप्नाली पाटील, रामा म्हात्रे, मनोहर सुर्वे, गणेश शिवलकर, ज्ञानेश्वर साळुंखे, नरेश पाटील, शांतीशील तांबे, मनोहर सकपाळ, नंदकुमार शिंदे, किशोर पाटील, सुधाकर वालेकर, राम नाकती आदी उपस्थित होते.

खासदार तटकरे म्हणाले, मी गोंदिया, भंडारा, गडचिरोली, नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये फिरलो. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये फिरलो. उत्तर महाराष्ट्रामध्ये अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक या जिल्ह्यांमध्ये फिरलो. कोकणामध्ये सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर व संपूर्ण मुंबईमध्येसुद्धा फिरलो. लोकसभेच्या निवडणुकीचे वातावरण राहिले नाही. आता जनतेच्या मनात स्पष्टपणे निर्णय झालाय या राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणायचे.

मधुकर पाटील यांनी आदिती तटकरे यांनी मंत्री असताना ग्रामीण भागातील खेड्यापाड्यात व आदिवासीवाडीमध्ये जल जीवन मिशन ही पाण्याची योजना राबवून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवला आहे. वरसे ग्रामपंचायतीमध्ये मागील लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे. या वेळी ही टक्केवारी वाढवण्याची आवश्यकता असून मागच्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत अधिकचे मताधिक्य आदिती तटकरे यांना देणार असल्याचे सांगितले. वरसे ग्रामपंचायतीच्या हद्दीत पाण्याच्या योजना सुरू आहेत. लवकरात भव्य स्वरूपात क्रीडांगण तयार होणार आहे. वरसे ग्रामपंचायतीसाठी रुग्णवाहिका मिळाली आहे. पाण्याचा, विजेचा प्रश्न सोडवण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी वरसे ग्रामपंचायतीसाठी सोलार पॅनल उपलब्ध करून देण्याची मागणी या वेळी पाटील यांनी केली.

अपूर्वा शिंदे, रोशन चाफेकर, उस्मान रोहेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अमित मोहिते यांनी, तर सूत्रसंचालन शांतिशील तांबे यांनी केले. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक व महिलावर्ग उपस्थित होता.



# नेरळमध्ये विजेचा शॉक लागून मुलगा जखमी

**माथेरान, कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात क्रिकेट खेळत असलेला मुलगा हरवलेला चेंडू शोधण्यासाठी गेला आणि उघड्या डीपीला जाऊन धडकला. त्यावेळी साधारण दीड मिनिट हा मुलगा त्या वीज रोहित्राला चिकटून जखमी झाला आहे. या मुलावर बदलापूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

नेरळ कुंभार आळी भागातील बापुराव धारप सभागृहासमोर वीज रोहित्र आहे. येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात मुले खेळत असतात. क्रिकेट खेळत असलेल्या मुलांचा चेंडू मैदानाबाहेर गेला व वीज रोहित्रामध्ये जाऊन पडला. त्यामुळे मुलांमधील मनीष धर्मेश पाटील हा १३ वर्षांचा मुलगा चेंडू शोधत असताना रोहित्राजवळ गेला व चेंडू दिसल्यावर काढण्यासाठी खाली वाकला. त्या वेळी विजेच्या झटक्याने मनीष रोहित्राला चिकटला. साधारण दीड ते दोन मिनिटे तो रोहित्राला चिकटून राहिला होता. अथक प्रयत्न करून मनीष पाटीलला तेथून खेचून काढण्यात आले आणि तत्काळ जखमी अवस्थेत नेरळ येथील डॉ. शेवाळे यांच्या रुग्णालयात उपचारासाठी नेले, मात्र मनीषची प्रकृती अस्वस्थ असल्याने बदलापूर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, घटना घडल्यानंतर त्या ठिकाणी काही वेळात महावितरणचे अभियंता हिंगणकर व अन्य वीज कर्मचारी पोहचले. त्यांनी आढावा घेतला.

# खोपोलीत मतदान जागृती

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराने



मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी समाजामध्ये जनजागृती करण्याचे व शंभर टक्के मतदान केले पाहिजे असा संदेश देण्याचे काम सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून खोपोली बाजारपेठेत आठवडी बाजारात कार्यकर्ते अशा आशयाचा संदेश देणारे बॅनर घेऊन उभे होते.

या उपक्रमाला जनतेचा चांगला प्रतिसाद मिळाला. संघाचे पर्यावरण आयाम प्रमुख अतुल कोठारी यांच्या नेतृत्वाखाली करण साळवी, विनोद बारगजे, प्रशांत लटके, प्रथमेश देवकर, करण देशमुख, चेतन देशमुख इत्यादी युवा कार्यकर्ते या मोहिमेत सहभागी झाले होते. घरोघरी पत्रके वाटण्याचे कामही कार्यकर्त्यांकडून सुरू आहे.

# ...तर शिवसैनिकच त्यांना जागा दाखवून देतील -आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभेत वासरचा खोंड हा आमचा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि त्यामुळे कोणी बूथ लावायला माणसे मिळणार नाहीत असे म्हणत असाल तर त्यांना येथील शिवसैनिकच जागा दाखवून देतील, असा हल्लाबोल आमदार आणि महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी केला. कर्जत तालुक्यात रॅली काढून प्रचारात धुरळा उडविताना आमदार थोरवे यांनी बीड येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.



महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी रॅलीची सुरुवात पळसदरी येथील स्वामी समर्थ मठातून केली. स्वामी समर्थांचा आशीर्वाद घेऊन प्रचाराची रॅलीची सुरुवात करताना आमदार थोरवे यांच्यासोबत महायुतीचे कार्यकर्ते हे किमान २०० वाहनांच्या ताफ्यासह सहभागी झाले होते. या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, संघटक संभाजी जगताप, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, माजी उपसभापती मनोहर थोरवे, भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, चिटणीस रमेश मुंढे यांच्यासह शिवसेना कर्जत तालुकाप्रमुख सुदाम पवाळी, महिला आघाडी तालुका संघटक रेश्मा म्हात्रे, भाजप तालुका अध्यक्ष रमेश भगत तसेच मोठ्या संख्येने पदाधिकारी सहभागी झाले होते.

पळसदरी येथून निघालेली रॅली कर्जत शहरातून शिरसे ग्रामपंचायत, खांडपे ग्रामपंचायतमधून कोंडीवडे ग्रामपंचायतमधील गावांचा प्रचार करून बीड गावात पोहचली. बीड येथून वेणगाव, वदप, गौरकामत, वरई, सावेले, भोईरवाडी येथून रॅली मार्केवाडी, कडाव येथून कशेळे येथे पोहचली.

बीड येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की, मतदारसंघामध्ये मी विकासकामे केली आहेत. या विकासाची पोचपावती म्हणून मतदारसंघातील सर्वसामान्य जनता धनुष्यबाण या निशाणीसमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने महायुतीचा उमेदवार विजय करतील हा आत्मविश्वास आहे. वासराचा खोंड परिसरात विरोधक म्हणत आहेत की, बूथ लावायला माणसे मिळणार नाहीत, पण असे कोणी म्हणत असेल तर माझे गावागावात समर्थक आणि शिवसैनिक आहेत. त्यामुळे कोणाच्या बोलण्याने त्यांच्या मनासारखे होणार नाही. वासरे खोंडा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि तो राहणारच.

जनतेने कायम विकासाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे दादागिरी करणाऱ्या, जमीन लाटणाऱ्यांना प्राधान्य देणार नाही. येथील जनता सुज्ञ आहे, असा टोलाही आमदार थोरवे यांनी विरोधकांना लगावला.

# मुरूडमध्ये सापडलेले चेक पोलिसांकडे केले जमा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड कोळीवाड्यातील रहिवासी असणारे दामू रामा खरगावकर यांना समुद्रकिनारी एचडीएफसी बँक शाखेचे बिननावी सही केलेले तीन चेक रस्त्यावर मिळाले होते. ते व त्यांची पत्नी कविता खरगावकर यांनी सापडलेले चेक मुरूड पोलीस ठाण्यात जाऊन जमा केले.



याबाबतचे सविस्तर वृत्त असे आहे की, मुरूड समुद्र किनारी रोजच्या प्रमाणे दामू खारगावकर आपल्या चायनीज गाडीवर सामान घेऊन जात असताना एक एक लाख रुपयांचे दोन व ५० हजार रुपयांचा एक असे एकूण दोन लाख ५० हजार रुपयांचे तीन सही केलेले चेक त्यांना रस्त्यावर दिसले. ताबडतोब त्यांनी हे चेक उचलून आजूबाजूच्या नागरिकांना याबाबत विचारणा केली, पण चेकचे मालक तिथे न सापडल्याने त्यांनी मुरूड पोलीस ठाण्यात जाऊन ठाणे अंमलदार हवालदार हरी मेंगाळ यांच्याकडे माहिती देऊन चेक जमा केले. या वेळी पोलीस हवालदार मेंगाळ यांनी निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली चेकचे मूळ मालक असलेले अमोल मांजरेकर (रा. श्रीवर्धन) यांचा शोध घेऊन त्यांच्याशी संपर्क करण्यात आला. मांजरेकर यांनी सांगितले की, मुरूड कोळीवाडा येथील मनोहर महादेव बैले यांना ते चेक एका व्यवहारासाठी दिले होते. तत्काळ बैले यांना पोलीस ठाण्यात बोलावून खात्री करून ते चेक मूळ मालक यांच्या सहमतीने बैले यांच्याकडे देण्यात आले. दामू खारगावकर यांच्या सजगतेमुळे मूळ मालकास पैसे मिळाल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# हा संघर्ष आहे स्थगिती आणि प्रगतीचा!

राज्याच्या विकासाला स्थगिती देणारे सरकार हवे की, प्रगतीला गती देणारे सरकार सत्तेवर हवे याचा निर्णय मतदारांनी करायचा आहे. अलीकडच्या अडीच वर्षांत वेगाने प्रगती करणाऱ्या सरकारचा अनुभव महाराष्ट्राने घेतला आहे.

विधानसभेसाठी होऊ घातलेली निवडणूक ही महाराष्ट्राची वाटचाल निश्चित करण्यासाठी निर्णायक ठरणार आहे. राज्यात कोणते सरकार हवे हे या निवडणुकीत मतदारांनी सजग राहून ठरवायचे आहे. राज्याच्या विकासाला स्थगिती देणारे सरकार हवे की प्रगतीला गती देणारे सरकार हवे याचा निर्णय मतदारांनी करायचा आहे. गेल्या पाच वर्षांतील पहिल्या अडीच वर्षांत राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते. महाराष्ट्राने त्यांच्या कार्यकाळात स्थगितीचा अनुभव घेतला. त्या आधीच्या सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली जे जे चांगले निर्णय घेतले होते, जी विकासकामे सुरू केली होती, त्यांना स्थगिती देण्याचे काम महाविकास आघाडीने केले. त्यामागे केवळ राजकारण होते. त्या पार्श्वभूमीवर अलीकडच्या अडीच वर्षांत वेगाने प्रगती करणाऱ्या सरकारचा अनुभव महाराष्ट्राने घेतला.

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना राज्याच्या प्रगतीला खीळ बसली. त्या सरकाने घेतलेल्या निर्णयांमुळे सर्वच क्षेत्रांत राज्याची पीछेहाट झाली. मुंबईतील आरे-कुलाबा मेट्रो प्रकल्पाचे काम निम्म्याहून अधिक पूर्ण झाले होते, मात्र हा प्रकल्प थांबविल्यामुळे महाविकास आघाडी सरकारने राज्याचे १४ हजार कोटींचे नुकसान केल्याचे स्पष्ट झाले आहे. अन्य अनेक जनहिताचे प्रकल्प महाविकास आघाडी सरकारने रोखल्यामुळे शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि गरीब जनता सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहिली. मुंबईचा किनारी मार्ग, अटल सेतू, मेट्रो, नवा विमानतळ, झोपडपट्टी योजना अशा अनेक योजना आणि प्रकल्प महायुती सरकारने पुढे राबविले. त्यामुळे विकास वेगाने सुरू झाला. प्रकल्प मार्गी लागले. सरकारने बिघडलेला महाराष्ट्राचा मार्ग रुळावर आणला.

समृद्धी महामार्ग प्रकल्पाला महाविकास आघाडीने विरोध केला होता. मराठवाडा वॉटरग्रीड योनजेतून मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीच्या प्रयत्नांनाही ठाकरे सरकारने खीळ घातली. अडीच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या सरकारने केलेल्या जनहिताच्या आणि राज्यहिताच्या एका तरी कामाचा दाखला त्यांनी द्यावा. ठाकरे सरकारने प्रकल्प रोखले आणि महायुती सरकारने थांबलेल्या, रोखल्या गेलेल्या प्रकल्पांना गती दिली. ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी केवळ सत्तेसाठी निवडणुका लढवत आहे, तर महायुती विकासाच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि विकासकामे दाखवून मते मिळविण्यासाठी निवडणुका लढवत आहे.

सरकारने ठरविले, तर विकासाचे शानदार उपक्रम सरकार राबवू शकते, हे महायुतीने सिद्ध केले आहे. विकासासोबत समाजजीवनाचा स्तर उंचावण्याच्या योजना राबविण्याची गरज ओळखून सरकारने लाडकी बहीण योजना राज्यात सुरू केली आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी अशा अनेक घटकांसाठी महायुती सरकारने आखलेल्या योजनांमुळे राज्याच्या सामाजिक विकासालाही गती मिळाली आहे.

महाविकास आघाडीने आपल्या सत्ताकाळात अनेक घोषणा केल्या, आश्वासने दिली, पण अमलात आणली नाही. त्यांच्याच सत्ताकाळात एसटी कर्मचाऱ्यांची परवड झाली, एमपीएससी परीक्षार्थींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांना वाऱ्यावर सोडले गेले, अनुसूचित जाती-जमातींकरिता आयोग नेमण्यात दिरंगाई केली, अतिवृष्टी आणि वादळग्रस्त शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत देऊन पाने पुसण्यात आली, कर्जमाफीच्या वारेमाप घोषणा करूनही अंमलबजावणी करण्यात आली नाही, आरक्षणाचा प्रश्न अधिक जटिल केला, प्रकल्प रखडले, उद्योगांना हिरवा कंदिल दाखविण्यात जाणीवपूर्वक टाळाटाळ करून महाराष्ट्राची औद्योगिक प्रतिष्ठाही घालविली.

या उलट महायुती सरकारने गेल्या सव्वादोन वर्षांत केलेल्या कामांचा लेखाजोखा प्रगतिपुस्तकाद्वारे महाराष्ट्रासमोर मांडला आहे. सामाजिक, औद्योगिक विकास व पायाभूत सुविधांमुळे राज्याचा बदललेला चेहरामोहरा जनतेसमोर आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नावाचा मुखवटा पांघरुन राज्याच्या विकासाचा विनाश करणाऱ्या अभद्र आघाडीला जनतेने नाकारले पाहिजे.

**-अभिजित पाटील**

# भारतीय क्रिकेट संघाचा ऐतिहासिक विजय

## मालिका ३-१ने जिंकली; द. आफ्रिकेचा दारुण पराभव

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या चार सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटचा सामना १३५ धावांनी जिंकून मालिका ३-१ने जिंकली. भारताने २० षटकांत एक विकेट गमावून २८३ धावा केल्या होता. लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेचा संघ १८.२ षटकांत १४८ धावांवरच मर्यादित राहिला.



जोहान्सबर्गच्या वॉण्डरर्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, ज्यामध्ये संजू सॅमसन आणि तिलक वर्मा यांच्याकडून तुफानी फलंदाजी पाहायला मिळाली, तर गोलंदाजीत अर्शदीप सिंगने भारतीय संघाकडून सर्वाधिक तीन बळी घेतले.

एडन मार्करामच्या नेतृत्वाखाली या टी-२० मालिकेत दक्षिण आफ्रिकेच्या संघाची फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही क्षेत्रात अत्यंत खराब कामगिरी झाली होती. मालिकेतील शेवटच्या सामन्यात आफ्रिकन संघाच्या गोलंदाजांकडून निराशाजनक कामगिरी पहायला मिळाली, ज्यामध्ये टीम इंडिया २८३पर्यंत धावसंख्या गाठली. लक्ष्याचा पाठलाग करताना यजमान संघ केवळ १४८ धावा करू शकला. त्यांची सुरुवात खूपच खराब झाली. आफ्रिकेने पहिल्या चार विकेट केवळ १० धावांवर गमावल्या होत्या. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात दक्षिण आफ्रिकेचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा पराभव आहे.

भारताकडून संजू सॅमसन आणि तिलक वर्मा यांनी तडाखेबंद फलंदाजी केली. संजूने ५६ चेंडूत नऊ षटकार आणि सहा चौकारांच्या मदतीने १०९ धावा केल्या; तर तिलकने ४७ चेंडूत १० षटकार आणि नऊ चौकारांच्या मदतीने १२० धावा केल्या. याशिवाय अभिषेक शर्माने १८ चेंडूत चार षटकार आणि दोन चौकारांसह ३६ धावा केल्या.

भारतीय संघाचा या वर्षातील हा अखेरचा आंतरराष्ट्रीय टी-२० सामना होता. या सामन्यातील विक्रमी कामगिरीसह भारतीय संघाने वर्ष अविस्मरणीय केले आहे. एका बाजूला टीम इंडियाने या वर्षात टी-२० क्रिकेटमध्ये अनेक विक्रम नोंदवले. एवढेच नाही तर या वर्षात भारताने एकही टी-२० मालिका गमावली नाही. २६ टी-२० सामन्यांपैकी संघाने २४ सामने जिंकलेत.

## १३ वर्षांचा मुलगा ऑक्शनमध्ये उतरणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी इंडियन प्रीमियर लीगची चाहत्यांना नक्कीच उत्सुकता लागली असेल. तत्पूर्वी २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी सौदी अरेबियातील जेद्दाह येथे आयपीएल २०२५साठी मेगा लिलाव आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी खेळाडूंची अंतिम यादी जाहीर झाली आहे. यामध्ये सर्वात तरूण खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या नावाचा समावेश आहे, जो फक्त १३ वर्षांचा आहे.

आयपीएल मेगा लिलावाच्या अंतिम खेळाडूंच्या यादीत वैभवच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. तो ३० लाख रुपयांच्या मूळ किमतीसह लिलावाच्या यादीत सामील झाला. वैभव आतापर्यंत अनेक देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळला आहे. त्याने रणजी ट्रॉफी, कूचबिहार ट्रॉफी आणि विनू मांकड ट्रॉफीमध्ये भाग घेतला आहे. यासोबतच त्याची भारताच्या अंडर-१९ संघातही निवड झाली होती.


विशेष म्हणजे वैभव सूर्यवंशी फलंदाजीसोबतच गोलंदाजीमध्येही उत्कृष्ट आहे. तो डावखुरा गोलंदाज आहे.

## रोहित शर्मा पुन्हा झाला बाबा!

### एक्सवर 'ज्युनियर हिटमॅन' ट्रेंड

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माच्या घरी नव्या पाहुण्याचे आगमन झाले आहे. रोहितची पत्नी रितिका सजदेहने मुलाला जन्म दिला आहे. ही बातमी मीडियात येताच रोहितचे चाहते खूप खूश झाले आहेत. एक्सवर तर 'ज्युनियर हिटमॅन' असा ट्रेंडदेखील सुरू आहे.



सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर चाहते रोहित शर्माचे अभिनंदन करत आहेत. या जोडपे दुसऱ्यांदा पालक बनले आहे. याआधी त्यांना समायरा नावाची सहा वर्षांची मुलगी आहे. अशात आता भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३-१ ने मालिका जिंकल्यानंतर चौथ्या सामन्यातील शतकवीर संजू-तिलक आणि कर्णधार सूर्याने व्हिडीओ शेअर करून रोहितला खास शुभेच्छा दिल्या आहेत.

शुक्रवारी संध्याकाळपासून सोशल मीडियावर रोहित शर्मा दुसऱ्यांदा बाबा झाल्याच्या पोस्टने एकच धुमाकूळ घातला होता, ज्यामुळे चाहते रोहितला यासाठी शुभेच्छा देत होते, पण रोहित शर्मा किंवा त्याची पत्नी रितिका सजदेह यांनी याबाबत कोणतीही ऑफिशियल माहिती दिलेली नव्हती, मात्र टीम इंडियाच्या सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि संजू सॅमसनने शुभेच्छा दिल्याने रोहित दुसऱ्यांदा बाबा झाल्याच्या बातमीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

रितिकाने शुक्रवारी मुंबईत त्यांच्या दुसऱ्या मुलाला जन्म दिला, असे सांगितले जात आहे. मुलाच्या जन्मामुळे रोहित शर्मा कसोटी मालिकेसाठी टीम इंडियासोबत ऑस्ट्रेलियाला गेला नाही, यावरही चर्चा सुरू होती, मात्र मुलाच्या जन्मानंतर आता तो ऑस्ट्रेलियाला जाण्याची शक्यता आहे.

## तिलक वर्माने देवासह कर्णधाराचे मानले आभार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची चार सामन्यांची टी-२० मालिका ३-१ अशी जिंकली. या मालिकेतील चौथ्या सामन्यात भारताकडून युवा फलंदाज तिलक वर्मा आणि संजू सॅमसनने नाबाद शतके झळकावली. वर्माने सलग दुसऱ्या सामन्यात शतक झळकावत दक्षिण आफ्रिकेच्या संस्मरणीय कामगिरी केली. त्याने ४७ चेंडूंत ९ चौकार आणि १० षटकारांच्या जोरावर नाबाद १२० धावांची खेळी साकारली. यानंतर त्या आकाशाकडे बोट का दाखवले.



तिलक वर्माने जोहान्सबर्गमध्ये शतक झळकावल्यानंतर खास पद्धतीने सेलिब्रेशन केले. त्याने शतक झळकावल्यानंतर आकाशाकडे बोट दाखवले. या इशाराचे रहस्य आता त्याने उलगडले आहे. २२ वर्षीय तिलकने तिसऱ्या सामन्यात ५६ चेंडूत नाबाद १०७ धावा केल्या होत्या. यानंतर चौथ्या सामन्यातही शतक झळकावत त्याने मोठा पराक्रम केला आहे. तो सलग दोन टी-२० सामन्यांमध्ये शतके झळकावणारा दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. या खेळीच्या जोरावर त्याने प्लेअर ऑफ द सिरीज पुरस्कारही जिंकला आहे. त्याने या मालिकेत सर्वाधिक २८० धावा केल्या. यासह त्याने एक मोठा विक्रम केला आहे.

तिलक वर्माने प्लेअर ऑफ द मॅच आणि प्लेअर ऑफ द सीरीजचा पुरस्कार जिंकून विक्रम केला आहे. पुरुषांच्या टी-२० मालिकेत दोन्ही पुरस्कार जिंकणारा तो सर्वात तरुण भारतीय खेळाडू ठरला आहे. पुरस्कार जिंकल्यानंतर तो म्हणाला, मी तुम्हाला एक मजेशीर गोष्ट सांगतो, गेल्या वर्षी जेव्हा मी येथे खेळायला आलो होतो, तेव्हा पहिल्याच चेंडूवर बाद झालो होतो, मात्र आज ही खेळी संघाला मालिका जिंकण्यासाठी खूप महत्त्वाची होती. मी फक्त मूलभूत गोष्टींचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करीत होतो. जसे मी गेल्या सामन्यात केले होते. मी शांत होतो. सलग दोन शतके, एक अविश्वसनीय भावना आहे. मी आता ते व्यक्त करू शकत नाही.

तिलक पुढे म्हणाला, दक्षिण आफ्रिकेतील आव्हानात्मक परिस्थितीत दोन शतके झळकावण्याची मी कल्पनाही केली नव्हती. यासाठी कर्णधार सूर्याचे आभार. गेल्या काही महिन्यांत मी जखमी झालो होतो. माझा देव आणि माझ्या प्रक्रियेवर विश्वास आहे. अशा परिस्थितीत जेव्हा मी माझे शतक पूर्ण झाले, मी फक्त देवाकडे बोट दाखवले आणि त्याचे आभार मानले.

## कर्णधार सूर्याने जिंकली मने

**मुंबई : प्रतिनिधी**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यादरम्यान भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने असे काही केले, ज्याने सर्वांची मने जिंकली. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.



वास्तविक, सोशल मीडियाचा सर्वात लोकप्रिय प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यामध्ये टीम इंडिया जेव्हा दक्षिण आफ्रिकेची विकेट पडल्यानंतर आनंद साजरा करत असताना, तेव्हा रिंकू सिंगने घातलेली भारतीय कॅप मैदानात पडते. त्यावर कर्णधार सूर्याकडून चुकून पाय पडतो. यानंतर तो भारतीय कॅप उचलतो. यानंतर तो तिचे चुंबन घेतो आणि तिला रिंकूच्या स्वाधीन करतो. त्याच्या या कृतीने भारतीय चाहत्यांची मने जिंकली. याचा व्हिडीओ आता व्हायरल होत आहे.

## सरावादरम्यान ऋतुराजची तडाखेबंद फलंदाजी

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सध्या २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या पर्थ कसोटीच्या तयारीत व्यस्त आहे. टीम इंडिया तयारीसाठी मॅच सिम्युलेशनचा वापर करत आहे, ज्यामध्ये सामन्याप्रमाणेच क्षेत्ररक्षण लावल्या जाते. काल विराट कोहली, यशस्वी जयस्वाल, रिषभ पंत आणि शुबमन गिलसारखे फलंदाज याद्वारे खेळताना दिसले. आज संघात नसलेल्या ऋतुराज गायकवाडला फलंदाजीची संधी मिळाली. या वेळी ऋतुराजने अशी फलंदाजी केली की, जी पाहूण सर्वजण खूपच प्रभावित झाले.



ऋतुराजने तासाभराहून अधिक काळ फलंदाजी केली. फलंदाजीदरम्यान तो खूपच आरामात दिसत होता. त्याने आपल्या डावात तीन वेगवेगळ्या गोलंदाजांविरुद्ध चार षटकार ठोकले. ऋतुराजने रविचंद्रन अश्विनला दोन षटकार आणि मानव सुथारला एक षटकार लगावला. याशिवाय हर्षित राणाच्या बाऊन्सरवर त्याने पुल शॉट खेळत षटकार टोलावला. यानंतर ऋतुराजने मैदान सोडले आणि सरफराज खान त्याच्या जागी फलंदाजीला आला.

ऋतुराज गायकवाड भारत 'अ' संघासोबत ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आला असून येथे तो संघाचे नेतृत्व करत आहे. भारत 'अ' संघातील खेळाडूंच्या उपस्थितीमुळे मुख्य भारतीय संघाचा मोठा फायदा झाला आहे. भारत 'अ' संघाला ऑस्ट्रेलिया 'अ'विरुद्ध झालेल्या दोन्ही अनधिकृत कसोटी सामन्यात दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. ऋतुराज या दोन्ही सामन्यात फ्लॉप ठरला होता.

## दुखापतीमुळे शुबमन गिल पहिल्या कसोटीतून 'आउट'?



**पर्थ : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेला सुरुवात होण्याआधी टीम इंडियाच्या ताफ्यात दुखापतीच ग्रहण लागले आहे. बॉर्डर-गावसकर ट्रॉफी स्पर्धेतील पहिला कसोटी सामना २२ नोव्हेंबरला पर्थच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. या सामन्याआधी भारतीय संघातील आणखी एक खेळाडूला दुखापत झाल्याची माहिती समोर येत आहे. हा खेळाडू दुसरा तिसरा कोणी नसून तो आहे शुबमन गिल. या आधी लोकेश राहुल दुखापग्रस्त झाल्याची बातमी समोर आली होती. त्यात आता आणखी एका नावाची भर पडलीये.

शुबमन गिल याला सराव सामन्यावेळी हाताच्या अंगठ्याला दुखापत झाली आहे. स्पिमध्ये कॅच पकडताना चेंडूचा जबऱ्या मार बसल्यामुळे तो पहिल्या कसोटीला खेळणे मुश्किल वाटते, अशी माहिती समोर येत आहे. बीसीसीआयने अद्याप त्याच्या दुखापतीसंदर्भात कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. जर तो सामन्याला मुकला तर टीम इंडियाचे टेन्शन आणखी वाढणार यात शंका नाही.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी सरावाला सुरुवात केल्यावर भारतीय ताफ्यातील खेळाडूंना दुखापतीने घेरल्याचे चित्र निर्माण झाले होते. लोकेश राहुलनं चेंडू लागल्यावर मैदान सोडल्याचा प्रकार घडला. सर्फराज खानही दुखापतीचा सामना करत आहे, अशी चर्चाही रंगली. एवढेच नाही तर विराट कोहली स्कॅनिंगसाठी हॉस्पिटलमध्ये गेल्याचे वृत्तही ऑस्ट्रेलियाच्या प्रसारमाध्यमांनी दिले होते.

## संजू-तिलकने लावली विक्रमांची रांग

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने पुन्हा एकदा टी-२० क्रिकेटमध्ये बेधडक फलंदाजी करत टी-२० क्रिकेटमधील दुसरी सर्वोच्च धावसंख्या उभारली. संजू सॅमसन आणि तिलक वर्मा यांच्या शतकांच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध फक्त एक विकेट गमावत २८३ धावांचा पर्वत उभारला. संजू आणि तिलक यांनी वादळी फलंदाजीच्या जोरावर सामन्यात विश्वविक्रम केले आहेत.

संजू सॅमसनने दोन वेळा शून्यावर बाद झाल्यानंतर पुन्हा एकदा शतक झळकावले, तर तिलक वर्माने लागोपाठ दुसरे शतक झळकावले आहे. संजू-तिलकने २१० धावांची विक्रमी भागीदारी रचली. यासह अनेक विविध विक्रम टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय संघाच्या आपल्या नावे केले आहेत.



✻ संजू सॅमसनने आपल्या टी-२० कारकिर्दीतील तिसरे शतक झळकावले आणि त्याने ही तीन शतके २०२४मध्ये केली आहेत. अशा प्रकारे एकाच वर्षात आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये तीन शतके करणारा तो पहिला फलंदाज ठरला.

✻ संजू सॅमसन एकाच मालिकेत दोन शतके करणारा भारताचा पहिला फलंदाज ठरला, तर काही वेळातच तिलक वर्मानेही त्याच्या विक्रमाची पुनरावृत्ती केली आणि असे करणारा तो दुसरा भारतीय फलंदाज ठरला. या दोघांपूर्वी संपूर्ण जगात केवळ इंग्लंडचा फिल सॉल्ट असा पराक्रम करू शकला आहे.

✻ तिलक वर्माने आपल्या टी-२० कारकिर्दीतील दुसरे शतक झळकावले आणि लागोपाठ त्याचे दुसरे शतक आहे. सेंच्युरियनमध्येही त्याने शतक झळकावले. अशा प्रकारे संजूनंतर सलग दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये शतके करणारा तो दुसरा भारतीय फलंदाज ठरला.

✻ तिलकने अवघ्या ४१ चेंडूत आपले शतक पूर्ण केले आहे, जे रोहित शर्मा (३५) आणि संजू सॅमसन (४०) नंतर भारतासाठी या फॉरमॅटमधील तिसरे जलद शतक आहे.

✻ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत संजू सॅमसन तिसऱ्या स्थानावर आहे. त्याच्या पुढे कर्णधार सूर्यकुमार यादव (४) आणि माजी कर्णधार रोहित शर्मा (५) आहेत.

✻ संजू आणि तिलक यांनी एकाच सामन्यात शतकं झळकावली आणि अशा प्रकारे पूर्ण सदस्य देशांमध्ये (म्हणजेच कसोटी क्रिकेट खेळणारे देश) टी-२० आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रथमच एका संघातील दोन खेळाडूंनी शतके केली आहेत.

✻ संजू आणि तिलकने दुसऱ्या विकेटसाठी २१० धावांची (नाबाद) भागीदारी केली, जी आंतरराष्ट्रीय टी-२० इतिहासातील सर्वात मोठी भागीदारी आहे. खरेतर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात २००हून अधिक धावांची भागीदारी होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

✻ टीम इंडियाने आपल्या डावामध्ये एकूण २३ षटकार ठोकले आहेत, जो टी-२०मध्ये एक नवा विक्रम आहे. यापूर्वी भारत, वेस्ट इंडिज आणि अफगाणिस्तानने प्रत्येकी २२ षटकार मारले होते.

✻ या मालिकेत तिलक वर्मा आणि संजू यांनी मिळून एकूण चार शतके केली आहेत. एखाद्या संघाने मालिकेत चार शतके झळकावण्याची ही पहिलीच वेळ आहे.

✻ टीम इंडियाची २८३ धावांची धावसंख्या दोन पूर्ण सदस्य देशांदरम्यान खेळल्या गेलेल्या सामन्यांमधली दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. सर्वोच्च धावसंख्येचा (२९७) विक्रमही भारताच्या नावावर आहे, जो गेल्या महिन्यातच बांगलादेशविरुद्ध आला होता.

## बॉर्डर-गावसकर मालिकेतील ऑलटाईम प्लेइंग ११

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठ्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेचा थरार पुन्हा एकदा पहायला मिळणार आहे. २२ नोव्हेंबरपासून ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर उभय संघांमधील पाच सामन्यांची कसोटी मालिकेला सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वकालीन सर्वोत्तम प्लेइंग ११ निवडण्यात आली आहे.

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी क्रिकेटमधील संघर्ष वर्षानुवर्षे सुरू आहे, पण १९९६-९७ पासून दोन्ही संघांमधील कसोटी सामना बॉर्डर-गावसकर ट्रॉफी म्हणून ओळखला जातो. या मालिकेला मोठा इतिहास आहे, ज्यामध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही देशांचे अनेक स्टार खेळाडू आहेत. त्यांनी या ब्लॉक बस्टर लढतींमध्ये चमक दाखवलेली आहे.

### दिग्गज खेळाडूंचा समावेश



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीबद्दल बोलताना, माजी भारतीय दिग्गज वीरेंद्र सेहवाग आणि ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीवीर मॅथ्यू हेडन सलामीवीर म्हणून कामगिरी केली आहे. त्यांची जोडी सर्वोत्तम सलामीवीर मानली जाऊ शकते. यामध्ये वीरेंद्र सेहवागने २२ कसोटीत ४१.३८च्या सरासरीने १७३८ धावा, तर मॅथ्यू हेडनने १८ कसोटी सामन्यात ५९च्या सरासरीने १८८८ धावा केल्या आहेत.

या मालिकेत रिकी पॉंटिंग क्रमांक तीनसाठी सर्वोत्तम ठरला आहे. त्याने २५ कसोटीत सुमारे ५५च्या सरासरीने २५५५ धावा केल्या. राहुल द्रविडला चौथ्या क्रमांकावर खेळेल. या माजी भारतीय फलंदाजाने ३२ कसोटी सामन्यांमध्ये सुमारे ४०च्या सरासरीने २१४३ धावा केल्या आहेत. सचिन तेंडुलकरचे नाव पाचव्या क्रमांकावर असेल. या मालिकेत त्याने ३४ कसोटीत ५६.२४च्या सरासरीने ३२६२ धावा केल्या. त्यामुळे महेंद्रसिंह धोनीला यष्टिरक्षक म्हणून ठेवता येईल. त्याने १९ कसोटींमध्ये ३५.३५च्या सरासरीने ९९० धावा केल्या.

याशिवाय ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार स्टीव्ह वॉचाही या संघात समावेश आहे. या मालिकेत त्याने १३ कसोटीत १००५ धावा केल्या आणि त्याला फक्त दोन विकेट घेता आल्या, तर आर अश्विनने बीजीटीमध्ये २२ कसोटीत ११४ विकेट घेतल्या आणि ५४५ धावा केल्या.

या कसोटी मालिकेच्या इतिहासात ऑस्ट्रेलियाचा फिरकी गोलंदाज नॅथन लायनचा गोलंदाजीत समावेश केला जाऊ शकतो. त्याने २६ कसोटीत ११६ विकेट्स घेतल्या आहेत. यानंतर भारताचा माजी वेगवान गोलंदाज झहीर खानला घेण्यात येणार आहे. त्याने १९ कसोटीत ६१ बळी घेतले आहेत, तर ऑस्ट्रेलियाचा माजी दिग्गज खेळाडू ब्रेट लीने १२ कसोटीत ५४ बळी घेतले आहेत.

## आयपीएल लिलावाच्या वेळ, प्रक्षेपणाबाबत अपडेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५चया महालिलावात कोणत्या खेळाडूंवर मोठी बोली लागणार यावर सर्वांच्या नजरा आहेत. येत्या २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी सौदी अरेबियातील जेद्दाह येथे मेगा लिलाव होणार आहे. आयपीएल काऊन्सिलने लिलावापूर्वी ५७४ खेळाडूंची यादी जाहीर केली असून त्यात ३६६ भारतीय आणि २०८ विदेशी खेळाडूंचा समावेश आहे. रिटेंशन यादी जाहीर केल्यानंतर फक्त २०४ स्लॉट शिल्लक आहेत. आयपीएल लिलाव किती वाजता आणि कुठे लाईव्ह पाहता येणार, जाणून घेऊया.



जेद्दाहमधील स्थानिक वेळेनुसार दुपारी १२.३० वाजता आयपीएल मेगा लिलाव सुरू होईल. भारत आणि सौदी अरेबियामध्ये दोन तास ३० मिनिटांचा फरक आहे. म्हणजे भारतात हा आयपीएल लिलाव दुपारी ३ वाजता सुरू होईल. बॉर्ड गावस्कर ट्रॉफीचा पहिला सामना सकाळी ७.५० वाजता सुरू होणार आहे. आयपीएल लिलाव सुरू होईपर्यंत भारत-ऑस्ट्रेलिया कसोटीच्या दिवसाचा खेळ संपलेला असू शकतो.

आयपीएल लिलावामध्ये भारताचे सर्वाधिक ३६६ खेळाडू आहेत, ज्यामध्ये ४८ कॅप्ड खेळाडूंचा समावेश आहे, तर २०८ विदेशी खेळाडू आहेत, त्यामध्ये १९३ कॅप्ड खेळाडू आणि १२ सहयोगी देशाचे खेळाडू आहेत. हा आयपीएल लिलाव टीव्ही चॅनेलवर स्पोर्ट्स १८वर आणि मोबाईलवर जिओ सिनेमा ॲपवर लाईव्ह पाहता येणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com